श्री लक्ष्मी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि., अ.नगर
मुख्य कार्यालय : अकोलकर हॉस्पीटल जवळ, बुरुडगांव रोड, अ.नगर फोन : (०२४१) ३५८६६५९
शाखा : बंधन बँकेशेजारी, नेप्ती रोड, केडगांव (देवी), अ.नगर. मो. ७४९९२३५९७५
ठेवीचे व्याजदर
* ४६ ते ९० दिवस ................ ८%
* ९१ ते ३६५ दिवस ................ ९%
* १ वर्ष व त्यापुढे ................ १०%
* शुभलक्ष्मी दाम दुप्पट ठेव योजना ..... ८४ महिने
* धनलक्ष्मी दैनंदिन बचत ठेव ...... ५ महिने मुदत
अमृत मासिक ठेव १.१५ लाखास १००० रु. दरमहा व्याज
कन्या लक्ष्मी १ लाखास ५ लाख रु.... १८ व्या वर्षी प्राप्त
दैनिक बचत (डेली कलेक्शन) / रिकरिंग (आर.डी.)/मुदत ठेव (एफ.डी.) साठी कमिशन एजंट नेमणे आहेत.
संस्थापक - श्री. अनिल मोहिते | अध्यक्ष - श्री. अजय मोहिते

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा | व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २७.०१.२०२५ | अंक नं. २७६ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

स्पेशल OFFER
STOCK CLEARANCE
ONLY ON SELECTED RANGE
20 - 50 % DISCOUNT
जरीवाला
कापड बाजार, अहमदनगर
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर

प्रशस्त दालन | प्रशस्त वाहनतळ | होलसेल विभाग | विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

## बसस्थानक परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट; पोलिसांचे मात्र दुर्लक्ष

नगर – नगर शहरातील जुन्या बसस्थानकासह स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकात गेल्या काही दिवसांमध्ये पाकीट चोरी, दागिने, पर्स, चोरीच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरटे सक्रिय झाले असताना आणि दररोज चोऱ्या करत असताना पोलिसांकडून मात्र अद्यापही तपासात निष्क्रियता दाखवली जात आहे.

नगर शहर हे उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ मराठवाड्याला जोडणारे मध्यवर्ती ठिकाण असल्याने शहरातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असतात. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील प्रवाशांची जुन्या बसस्थानकात तर परजिल्ह्यात जाणाऱ्या प्रवाशांची पुणे बसस्थानकात दररोज मोठी गर्दी होत असते. यात विशेषतः महिलांना एस.टी. बस प्रवाशी भाड्यात राज्य सरकारने सवलत जाहीर केलेली असल्याने एस टी बस प्रवासासाठी महिलांची गर्दी मोठ्या प्रमाणावर आहे. महिलांची गर्दी वाढण्याबरोबरच या गर्दीत बस मध्ये चढताना, उतरताना महिलांच्या गळ्यातील दागिने, पर्स मधील दागिने, पैसे चोरी जाण्याचे प्रमाणही वाढले आहे. चोरटे गर्दीत मिसळून हातसफाई करत आहेत. गेल्या काही दिवसांत या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याने नगर मधील बस स्थानके चोरट्यांचे अड्डे बनले असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

### महिलेच्या दागिन्यांच्या पाकीटाची चोरी

**माळीवाडा बसस्थानकातील घटना, अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल**

एसटी बसमध्ये बसण्यासाठी आत प्रवेश करताना असलेल्या गर्दीचा फायदा घेऊन कोणीतरी अज्ञात चोरट्याने महिला प्रवाशाच्या बॅग मधील सोन्याची ५ ग्रम वॅजनाची बोरमाळ चोरून नेल्याची घटना २५ जानेवारीला दुपारी १२ च्या सुमारास माळीवाडा बसस्थानकावर घडली.

याबाबत निलावती विठ्ठलराव लोंढे (वय ६६, रा. चौपाटी कारंजा, आयडीबीआय बँकेशेजारी, दिल्लीगेट रोड) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या त्यांच्या मुलीला भेटायला जायचे असल्याने माळीवाडा बसबसस्थानकात गेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची बोरमाळ काढून पाकीटात ठेवली. व ते पाकीट कपडे ठेवण्याच्या बॅगमध्ये ठेवले. त्या नगर ते पंढरपुर जाण्याऱ्या बसमध्ये बसण्यासाठी जात असताना बसचे दरवाज्याजवळ गर्दी झाली होती. त्या कशाबशा बसमध्ये जाऊन बसल्या व तिकीट काढण्यासाठी बॅगची चेन खोलून पाकीट घेण्यासाठी हात घातला असता त्यांना बॅगमध्ये पाकीट मिळुन आले नाही. त्यामुळे त्यांची खात्री झाली की कोणीतरी अज्ञात इसमाने गर्दीचा फायदा घेवुन बॅगेत ठेवलेले पाकिट व त्यात असलेले सोन्याचे ५ ग्रॅम वजनाची बोरमाळ चोरुन नेली आहे. त्यानंतर त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलिस हवालदार राजेंद्र औटी हे करीत आहेत.

## पाण्यात गुंगीचे औषध टाकून तरुणीवर मित्राकडून अत्याचार

**नगर – पुणे महामार्गावर चास जवळील लॉजमध्ये घडला प्रकार, तरुणावर गुन्हा दाखल**

नगर – श्रीरामपूर येथून पुणे येथे खासगी गाडीने जाताना २३ वर्षीय तरुणीस पाण्यात गुंगीचे औषध टाकून ती गुंगीत असताना तिच्यावर बळजबरीने अत्याचार केल्याची घटना २६ जानेवारीला दुपारी नगर पुणे महामार्गावर चास शिवारातील एका लॉजवर घडली. याप्रकरणी पिडीत तरुणीच्या फिर्यादी वरुन कोतवाली पोलिस ठाण्यात अहमद हसन सय्यद (रा. न्यु इंग्लिश स्कुल मार्ग, खंडाळा, ता. श्रीरामपुर) या तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपासासाठी तो नगर तालुका पोलिस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती अशी की मूळची श्रीरामपूर तालुक्यातील व हल्ली नोकरी निमित्त पुणे येथे राहणाऱ्या २३ वर्षीय मुलीच्या वर्गात काही वर्षापूर्वी अहमद हसन सय्यद हा होता. त्यामुळे दोघांची ओळख होती, त्यांचे एकमेकांसोबत व्हॉटसप या सोशल मीडिया माध्यमातुन, तर कधी मोबाईल फोनवरुन बोलणे होत असते. ती तरुणी नातेवाईकांच्या लग्न समारंभाकरिता पुण्याहून श्रीरामपूर येथे आली होती. त्यानंतर २६ जानेवारी रोजी पुणे येथे जाण्यासाठी श्रीरामपूर बस स्थानकावर गेली. त्यावेळी तिला अहमद सय्यद याचा फोन आला. तो तिला म्हणाला की मी पण पुण्याला चाललो आहे. तु माझ्यासोबत माझ्या गाडीमध्ये चल असे म्हणल्याने तसेच तो ओळखीचा असल्याने ती त्याच्या स्वीफ्ट कार (क्र. एम एच १२ जे एच २११२ ) मध्ये बसली.

ते राहुरीच्या पुढे आल्यानंतर तिला उलटी आल्यासारखे होऊ लागल्याने अहमद याने तिला त्याचे गाडीमध्ये असलेली पाण्याची बाटली दिली. त्यानंतर ते नगर पास करुन पुढे गेले असता तिला चक्कर येऊ लागली. त्यामुळे तिने अहमदला गाडी रोडच्या कडेला थांबवण्यास सांगितले. त्यावर अहमद म्हणाला की, आपण रोडवर न थांबता समोर असलेल्या लॉजवर जाऊ, तु तेथे फ्रेश हो त्यावर तिने त्याला नको म्हणाले परंतु त्याने आग्रह करुन लॉजमध्ये नेले. त्यावेळी अहमदने तिला पुन्हा पिण्यासाठी पाणी दिले. पाणी पिल्याने तिला आणखीन चक्कर येऊ लागल्यावर अहमद हा तिच्याशी लगट करु लागला. त्यास तिने विरोध केला मात्र गुंगीचा अंमल असल्याने तिचा विरोध तोकडा पडला व अहमद याने तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. ती खूप रडली. परंतु त्याने तिचे काही ऐकले नाही. त्यानंतर त्या तरुणीने हा प्रकार तिच्या घरच्यांना फोन करून सांगितला व त्यांना चास येथे बोलावून घेतले. त्यानंतर पिडीत तरुणीने नातेवाईकासह कोतवाली पोलीस ठाणे गाठले.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी पिडीत तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरुन अहमद हसन सय्यद याचेविरुध्द गुन्हा दाखल केला असून सदर घटना नगर तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली असल्याने सदर गुन्हा पुढील तपासासाठी नगर तालुका पोलीस स्टेशन कडे वर्ग करण्यात आला आहे.

## नोकरदाराला प्रेमाच्या जाळयात ओढुन मित्रांच्या मदतीने लुटले

**बीडच्या तीन आरोपींना पोलिसांनी पकडले, फरार महिलेचा शोध सुरु**

नगर – नगरच्या विळदघाट परिसरात नोकरीस असलेल्या एका महिलेने (मूळ रा. बीड) तिच्या सोबत काम करणाऱ्या एका नोकरदाराला प्रेमाच्या जाळ्यात ओढत, आपल्या बीड मधील ३ साथीदारांच्या मदतीने लुटल्याची घटना एमआयडीसी परिसरात २४ जानेवारीला रात्री ८.३० च्या सुमारास घडली. या लुटमारी नंतर पसार झालेल्या तिघांना नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बीड मध्ये पकडले असून सदर महिला अद्याप फरार आहे. तिचा कसून शोध स्थानिक गुन्हे शाखा व एमआयडीसी पोलिस घेत आहेत.



एमआयडीसी परिसरात नोकरदार व्यक्तीस लुटणाऱ्या बीड येथील तिघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

याबाबतची माहिती अशी की, नगर शहरातील पाईपलाईन रोडवर राहणारा एक नोकरदार व्यक्ती व त्यांची मैत्रीण हे दोघे २४ जानेवारीला रात्री ८.३० च्या सुमारास एमआयडीसी परिसरात नाथकृपा ट्रान्सपोर्ट ते पेट्रोल पंप दरम्यान असलेल्या मोकळ्या पटांगणात गप्पा मारत बसलेले असताना तेथे आलेल्या ३ अनोळखी इसमांनी फिर्यादी असलेल्या नोकरदारास मारहाण करून १ लाख रूपये ऑनलाईन ट्रान्सफर करून घेतले. तसेच २५ जानेवारीला पुन्हा फिर्यादी फोन करून त्याचे व त्याच्या मैत्रिणीचे व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन, पैशाची मागणी केली. याबाबत फिर्यादीने २६ जानेवारीला एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात ३ आरोपींच्या विरुद्ध खंडणीसह जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला होता.

या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. दिनेश आहेर यांना समांतर तपास करून गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. या आदेशान्वये पो. नि. आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस उपनिरीक्षक अनंत सालगुडे व पोलीस अंमलदार संदीप पवार, सुरेश माळी, पंकज व्यवहारे, फुरकान शेख, प्रशांत राठोड व महादेव भांड यांचे पथक नेमुन तपास सुरु केला. सदर पथक तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा शोध घेत असताना पथकास सदरचा गुन्हा हा मयुर ढोले (रा.बीड) याने त्याचे साथीदारासह केल्याची माहिती मिळाली. पथकाने मिळालेल्या माहितीवरून संशयीत इसमांचा बीड शहरामध्ये शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. त्यामध्ये मयुर मधुकर ढोले (वय २७, रा.सुयोग अपार्टमेंट, शिवाजीनगर, बीड), अभिजीत शंकर गलधर (वय २७, रा.सिध्देश्वर, एमआयडीसी बीड), नितीन स्वामी डांगरे (वय २६, रा.बुरूडगल्ली, हिरालाल चौक, बीड) यांचा समावेश आहे.

### चौघांनी 'असा' केला लुटीचा प्लॅन

पथकाने ताब्यातील आरोपींकडे कसून चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा प्रियंका नावाच्या महिलेच्या मदतीने केल्याची माहिती सांगीतली. आरोपी मयुर मधुकर ढोले याने सांगीतले की, त्याची मैत्रीण प्रियंका ही सध्या विळदघाट परिसरात नोकरीस आहे. तिचे नोकरीच्या ठिकाणी असलेले फिर्यादी यांचेशी तिची चार – पाच महिन्यापासुन ओळख असून त्यास प्रेमाच्या जाळ्यात अडकवून त्याचेकडून पैसे काढायचे असे ठरले. त्यानुसार प्रियंका ही २४ जानेवारीला फिर्यादी यास नाथकृपा ट्रान्सपोर्ट, एमआयडीसीच्या पटांगणात घेऊन गेली.

त्यावेळी आरोपी हे लाल रंगाच्या आय टेन कार (क्र. एमएच ०२ बीटी ७४२३) मधुन त्या ठिकाणी गेले. आरोपीतांनी दोघांचे फोटो व व्हिडीओ काढुन फिर्यादीस व्हिडीओ व फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन, मारहाण केली. आरोपीतांनी बळजबरीने फिर्यादीचे मोबाईल फोन पे वरून मयुर मधुकर ढोले याचे मित्राचे फोन पे वर एक लाख रूपये ट्रान्सफर करून घेतले असल्याची माहिती सांगीतली. पकडलेल्या या आरोपींना गुन्ह्याचे तपासकामी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले असून पुढील तपास एमआयडीसी पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

घराची सुरक्षा
३६५ दिवस
३६० डिग्रीमध्ये
ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
98222 94622

आनंद श्रद्धा लेडीज होस्टेल
खिस्त गल्ली, चर्च रोड, मुंजोबा मंदीर जवळ
गाडी पार्किंग पुर्ण सुरक्षीत आहेत
फक्त ६ जागा
स्वतंत्र किचन, फक्त शुध्द शाकाहारी जेवण, चहा, दूध, नाष्टाची सोय
मास्टर - 9420027945

Mount Litera Zee School
NURTURING POTENTIAL, UNLEASHING BRILLIANCE.
CBSE AFFILIATION NO 1130870
Admissions open 2025-26
Daund Road, Arangaon, Ahilyanagar 414006
नर्सरी ते दहावी पर्यंत
दर्जेदार शिक्षण प्रणाली
FUTURE READY SCHOOL
माऊंट लिटेरा झी स्कूल
अरणगांव, दौंड रोड, अहिल्यानगर
8263063744 / 7038730387

आता खास रुग्णांच्या सेवेसाठी
दि. १ फेब्रुवारी २०२५ पासून
परिपूर्ण मेंदू विकार विभाग (न्युरोलॉजी डिपार्टमेंट)
तज्ञ डॉक्टर - डॉ. गौतम काळे, डी.एन.बी., न्युरोफिजिशियन, मेंदुविकार तज्ञ - ओपीडी वेळ : दररोज सकाळी १० ते २
तज्ञ डॉक्टर - डॉ. अद्वैत गिते, एम.बी.बी.एस., एम.डी. (मेडिसीन), डी.एम. न्युरोलॉजी, मेंदुविकार तज्ञ - ओपीडी वेळ : दररोज दुपारी ४ ते ६
डोकेदुखी, मायग्रेन, फिट, हातापायाला मुंग्या येणे, अपस्मार, नसावरील सुज, तोल जाणे, चक्कर यणे, अर्धांगवायु, पॅरालेसीस इ. आजारावर तपासणी व उपचार
EEG, NCV, VEP, RNS, BERA, EMG, Blink Refiex या तपासण्या अत्याधुनिक मशिनरीद्वारे उपलब्ध...
तरी जास्तीत जास्त रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा...
हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.
24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक
डिजीटल एक्सरे रू. 250/- | सोनोग्राफी रू. 800/- | सिटी स्कॅन रू. 1250/- | एम.आर.आय. रू. 2500/-
जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
श्री आनंदऋषिजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड हार्ट सर्जरी सेंटर, अ.नगर
१२४, आनंदऋषीजी मार्ग, अ.नगर. फोन : २३२०४७३, ७४, ७५ । मो. ९४०४३९९९११

दिनांक : 24 जानेवारी ते 30 जानेवारी 2025
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
SKY FORCE 0800A M I 10:25 AM I 12:45 PM 03:15 PM I 04:30 PM I 05:40 PM 06:50 PM I 08:05 PM I 10:30 PM
DAKU MAHARAJ 07:45 AM 04:30 PM
FUSSCLASS DABHADE 1030A M I 07:30 PM
GAME CHANGER 08:00 AM 01:25 PM
PUSHPA-2 09:15 PM
EMERGENCY 11:00 AM 04:30 PM
AZAAD 01:45 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

SONI Since 1965 TILES
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 24 JAN - 27 JAN 2025
स्काय फोर्स | डाकू महाराज Hindi | इमर्जन्सी
पुष्पा - 2 The Rule Reloaded | मुफासा (3D) Hindi
टीप: शो च्या वेळा बदलु शकतात
Box Office | bookmyshow
Cinelife MINIPLEX
Near Nagar College, Above Zudio, A.nagar
9881300400, 0241-2346000

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## कोनेरू हम्पी - चॅम्पियन बुद्धीबळपटू




भारताचा आंतरराष्ट्रीय दबदबा प्रचंड वाढला आहे. आमच्या कर्तृत्ववान महिलाही यात मागे नाही. राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री यापासून जागतिक कीर्तीच्या उद्योजिका, सीइओ, प्रशासकीय अधिकारी, खेळाडू इ. म्हणून त्यांनी यशाचा डंका सर्वदूर पोहोचवलाय.

भारताच्या कोनेरू हम्पीने बुद्धीबळात जागतिक जलद (रॅपिड) बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेत दुसऱ्यांदा विजेतेपद मिळवतांना ऐतिहासिक, विक्रमी अशी कामगिरी केली आहे. हम्पी या शब्दाचा इंग्रजी अर्थ 'चॅम्पियन' असा आहे. खऱ्या अर्थाने ती चॅम्पियन आहे.

वडिलांच्या प्रोत्साहन व प्रयत्नांमुळे कोनेरू वयाच्या अवघ्या ५ वर्षापासून बुद्धीबळाचे डावपेच शिकली. मोठ्या, प्रतिस्पर्धक मुलांबरोबर खेळण्याने तिने झपाट्याने प्रगती करून केवळ नवव्या वर्षी म्हणजेच १९९६ मध्ये ती राष्ट्रीय चॅम्पियन बनली.



आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी प्रवास, आर्थिक नियोजन म्हणून प्रारंभी बँक ऑफ बडोदाने प्रायोजकत्व दिले पण मजबूत आर्थिक पायासाठी तिने ONGC या सरकारी कंपनीत नोकरी पत्करली. २०१९ मधील मॉस्को येथील वर्ल्ड रॅपीड चेस कॉम्पिटिशनमध्ये पहिल्यांदा जागतिक विजेतेपद पटकावून वडिलांचे स्वप्न पूर्ण केले.

आपल्या यशाने आईवडिलांची कामना पूर्ण करण्याचा आनंद असून यामुळे अन्य महिला, भारतीयांना बुद्धीबळ खेळण्याची प्रेरणा मिळून अनेक युवा खेळाडू व्यावसायिक बुद्धीबळास प्रेरीत व्हावीत ही तिची इच्छा आहे.

# पैसे घेवूनही फ्लॅटचा ताबा न देता एकाची १८ लाख रुपयांची फसवणूक

**नगरमधील बांधकाम व्यावसायिकावर गुन्हा दाखल**

नगर - फ्लॅट खरेदी करिता १८ लाख रुपये घेवूनही फ्लॅटचा ताबा न देता तो परस्पर दुसऱ्याच व्यक्तीला विकून दोघा बांधकाम व्यावसायिक भागीदारांनी एकाची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात दोघांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबतची माहिती अशी की, संदीप श्रीमल भळगट (वय ४२, रा. सिव्हील हडको, अ.नगर) यांना घर घ्यायचे असल्याने त्यांनी यशश्री कन्स्ट्रक्शनशी संपर्क साधला. सदर फर्म ही मनिष शेषमल भंडारी व वैशाली राजकुमार सोनसळे यांचे भागीदारीत आहे. त्यांनी त्यांच्या समृध्दी एन्क्लेव्ह या इमारती मधील फ्लॅट नंबर २०४ हा भळगट यांना दाखवून त्याचे ७/१२ उतारे व इतर बिल्डींग कन्स्ट्रक्शन बांधकाम नकाशा व इतर कागदपत्र दाखविले. त्यावेळी त्या ७/१२ उताऱ्यावर यशश्री कन्स्ट्रक्शनचे भागीदार यांचे नाव तसेच फ्लॅटचे घोषणापत्र प्रमाणे नोंदी असल्याचे दिसले.

तो फ्लॅट कोणासही विक्री केलेला नव्हता. त्या फ्लॅटची किंमत १८ लाख रुपये निश्चित करण्यात आली. त्यातील ३ लाख रुपये रकमेचा एचडीएफसी बँकेचा चेक १ ऑगस्ट २०१३ रोजी भळगट यांनी यशश्री कन्स्ट्रक्शनच्या नावे दिला. व उर्वरीत १५ लाख रुपये ही रक्कम भळगट यांनी एच डी एफ सी बँकेचे कर्ज करुन यशश्री कन्स्ट्रक्शनच्या नावे चेक दिला. त्याप्रमाणे यशश्री कन्स्ट्रक्शन ला चेक प्राप्त झाल्यानंतर खरेदीखताचा दस्त दिनांक ३१ ऑगस्ट २०१३ रोजी दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त अन्वये नोंदविण्यात आला. तसेच भळगट यांनी फ्लॅटचे गहाणखत एचडीएफसी बँकेचे हक्कात करुन दिले.

खरेदीखत नोंदवून झाल्यानंतर भळगट यांनी त्यांना फ्लॅटचा ताबा देण्याची मागणी केली असता त्यांनी आज देता उद्या देतो असे करुन टाळाटाळ केली. त्यानंतर भळगट फ्लॅटचा ताबा घेण्यासाठी गेले असता त्यांना कळाले की तो फ्लॅट क्र. २०४ हा यापूर्वीच रमणलाल धनराज गांधी यांना विकलेला आहे. त्यामुळे भळगट हे पुन्हा मनीष भंडारी यांचकडे फ्लॅटचा ताबा मागण्यासाठी गेले असता त्यांनी सांगितले की तुम्हाला चुकून फ्लॅट क्र. २०३ ऐवजी २०४ चा उल्लेख झालेला आहे. त्याप्रमाणे २६ डिसेंबर २०१७ रोजी दस्तान्वये चूक दुरुस्तीचा लेख करुन दिला. त्यानंतर भळगट पुन्हा मनीष भंडारी यांना फ्लॅट क्र. २०३ चा ताबा मागण्यासाठी गेले असता त्यांनी ताबा देण्यास टाळाटाळ केली.

यशश्री कन्स्ट्रक्शनचे भागीदार यांनी चूक दुरुस्ती लेखान्वये जो फ्लॅट खरेदी करुन दिला तो फ्लॅट २८ डिसेंबर २०११ रोजी साठेखताने व दि. १३ जून २०१३ चे खरेदी खताने डॉ. नितीन दामोदर साळवे व सौ रोहीणी नितीन साळवे (दोघे रा. कर्जत) यांना विकल्याचे दिसून आले. या प्रमाणे यशश्री कन्स्ट्रक्शनचे मनिष शेषमल भंडारी व वैशाली राजकुमार सोनसळे यांनी बनावट व खोटे कागदपत्र बनवून आपली फसवणुक केली असल्याचे भळगट यांनी फिर्यादीत म्हंटले आहे.

या प्रकरणी संदीप भळगट यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी मनीष भंडारी व वैशाली सोनसळे यांचे विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता कोकाटे या करीत आहे.


अहिल्यानगर ते पुणे बससेवा सुरळीत करावी, या मागणीचे निवेदन राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना देताना शहर भाजपचे पदाधिकारी.

## अहिल्यानगर ते पुणे बससेवा सुरळीत करावी अन्यथा 'आंदोलन' करणार

**भाजपचा राज्य परिवहन महामंडळास इशारा**

नगर - अहिल्यानगर ते पुणे बससेवेबाबत अनेक तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने सोमवारी वेळेवर बस न सुटणे, खराब बसेस मोठ्या प्रमाणात असणे, महाराष्ट्रातील विस्ताराने सर्वात मोठ्या जिल्ह्यात नवीन बसेस नसणे.

वास्तविक महाराष्ट्रातील सर्वात पहिली एसटी नगर ते पुणे मार्गावर सुरू करण्यात आली होती, त्या मार्गावर सध्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनींना नियोजनशून्य कारभाराचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. येत्या पंधरा दिवसांत या मार्गावर बस सेवा व्यवस्थितपणे सुरू झाली नाही तर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राज्य परिवहन महामंडळास शहर भाजपने दिला आहे.

यावेळी सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, पंडित वाघमारे व युवा मोर्चा अध्यक्ष मयूर बोचूघोळ आदी उपस्थित होते.

## भागचंद पठारे यांचे दु:खद निधन



नगर - जिल्हा सहकारी बँकेचे माजी शाखाधिकारी, श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक तसेच बनपिंपरी (ता. श्रीगोंदा) गावचे रहिवासी असलेले भागचंद हरिभाऊ पठारे (वय ७४) यांचे २६ जानेवारी रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. धोंडीआबा विविध कार्यकारी सोसायटीचे ते संस्थापक चेअरमन होते. श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक नितीन पठारे व प्रगतशील शेतकरी सचिन पठारे यांचे ते वडिल होत. त्यांचावर बनपिंपरी गावातील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## ओ.पी.नय्यर स्मृतिदिनानिमित्त २९ जानेवारीला 'दिल की आवाज भी सुन' हिंदी गाण्यांची मैफल




नगर - अनाहत एक कलासृष्टी संस्थेतर्फे ओ. पी. नय्यर हिट्स या हिंदी चित्रपटसृष्टीतील मशहूर संगीतकार ओ. पी. नय्यर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांनी संगीतबद्ध केलेल्या दिल की आवाज भी सुन ही हिंदी गाण्यांची मैफलीचे आयोजन २९ जानेवारी रोजी सायं. ६.३० वाजता माऊली सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमात गायक व गायिका अभय कांकरिया, संदिप भुसे, डॉ. सत्तार सय्यद, डॉ. नीरज करंदीकर, इंजि.अजय दगडे, सौ.आरती दीक्षित, कु.शिवानी कुलकर्णी, सौ.श्रेया सुवर्णपाठकी हे कलाकार गाणी सादर करणार असून ढोलक - ललित भूमकर, तबला - अजित गुंदेचा, कॉंगो - गौतम गुजर, ड्रमसेट - अजय साळवे, ऑक्टोपॅड - निलेश सोज्वळ गिटार - संकेत देहाडे व अमित बरुवा, कीबोर्ड - राजेश देहाडे व दिलावर शेख हे वादक साथसंगत करणार असून नाशिक येथील निवेदक उस्मान पटणी हे निवेदन करणार आहेत. ध्वनी व्यवस्था शांती ऑडिओ राजू ढोरे यांची आहे.


कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून परंतु प्रवेशिका अनिवार्य आहे. रसिकांनी मैफलीला उपस्थित राहावे, असे आवाहन अनाहतचे अध्यक्ष प्रसाद सुवर्णपाठकी व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## कृषी यांत्रिकीकरण योजनेबाबत अभिप्राय सादर करण्याचे आवाहन

नगर - कृषी विभागामार्फत सन २०२१-२२ पासून कृषी यांत्रिकीकरण योजना महाडीबीटी प्रणालीद्वारे सोडत पद्धतीने राबविण्यात येत आहे. या योजनेच्या सध्याच्या सोडत पद्धतीविषयी बदल करण्यासाठी शेतकऱ्यांनी त्यांचे अभिप्राय ३० जानेवारी २०२५ पर्यंत कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात सादर करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

कृषी यांत्रिकीकरण योजनेची सध्याची सोडत पद्धत योग्य आहे का, प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या पद्धतीची सोडत पद्धत असावी असे वाटते काय, प्रचलित सोडत पद्धत व प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य यापैकी कोणती सोडत पद्धत प्राधान्याने राबवावी याबाबतचे अभिप्राय सादर करावेत, असेही कळविण्यात आले आहे.

## तुकाराम तुपे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - नवनागापूर येथील रहिवासी तुकाराम भिवसेन तुपे (वय ७८) यांचे २६ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. एमआयडीसीतील वेणु उद्योग समुहाचे संचालक सुबोध, प्रबोध तुपे यांचे ते वडील होत.

## एस. पी. जोशी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - पुणे येथील रहिवासी एस. पी. जोशी (वय ७३) यांचे २५ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर हडपसर येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, २ मुली, जावई, नातू असा परिवार आहे.

## सौ. मंगलाबाई कुलकर्णी यांचे निधन



नगर - येथील तपोवन येथील माजी अंगणवाडी सेविका सौ. मंगला भास्कर कुलकर्णी (वय ७९) यांचे दुःखद निधन झाले. त्यांचे पश्चात पती, ५ मुली, जावई, नातवंडे असा परिवार असून त्या पाटबंधारे खात्यातील सेवा निवृत्त भास्कर दिगंबर कुलकर्णी (बी डी) यांच्या पत्नी होत.

## श्रीमती रामकन्या ओझा यांचे निधन



नगर - येथील श्रीमती रामकन्या गंगाबिसन ओझा (वय ८३) यांचे २६ जानेवारी रोजी दुपारी ११.४५ वाजता दु:खद निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर नगर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या आत्यांत धार्मिक व मनमिळावू स्वभावाच्या होत. विनोद स्क्रीनचे संचालक बालकिसन (पप्पू) ओझा विनोद ओझा यांच्या मातोश्री होत.

## शांताबाई वाळके यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - नगर तालुक्यातील बाबुर्डी बेंद येथील शांताबाई किसन वाळके (वय ८५) यांचे २६ जानेवारीला वृद्धापकाळाने निधन झाले. सायंकाळी बाबुर्डी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. एसटी महामंडळाचे सेवानिवृत्त वाहक साहेबराव वाळके व ईश्वर वाळके यांच्या मातोश्री तर ग्रामपंचायत सदस्य विजय वाळके यांच्या त्या आजी होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## रात्रीच्यावेळी संशयितरित्या फिरणाऱ्या दोघांना पकडले

नगर - मध्यरात्री काहीतरी गैरकृत्य करण्याच्या उद्देशानेसंशयित रित्या वावरणाऱ्या दोघांना तोफखाना पोलिसांनी सावेडी उपनगरातील तपोवन रोडवरील बारा एकर परिसरात पकडले आहे. २६ जानेवारी रोजी पहाटे ३ वाजता ही कारवाई करण्यात आली आहे. धिरज दिलीप निक्रड (वय २९, रा. गणेश चौक, बोल्हेगाव फाटा), आयुष राजकुमार रामफळे (वय १९, रा.पाईपलाइन रोड, अ.नगर) अशी त्यांची नावे आहेत.

या बाबतची माहिती अशी की तोफखाना पोलीस रात्रीची गस्त करीत असताना त्यांना तपोवन रोड येथे रोडलगत दोन इसम मोटारसायकल वर संशयितरित्या थांबलेले आहेत. पोलिसांनी त्या ठिकाणी जावून त्यांना ताब्यात घेतले. त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी समाधान कारक उत्तरे दिली नाही. त्यांच्या कडील मोटारसायकल तपासली असता त्यांचेकडे लोखंडी गज आढळून आले. त्यांना मोटारसायकलबाबतही माहिती देता आली नाही यावरून ते एखादा गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याच्या संशयावरून पोलिसांनी दोघांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## रात्रीच्या वेळी हातात तलवार घेऊन फिरणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगाराला गांधी मैदानात पकडले

नगर - रात्रीच्या वेळी हातात नंगी तलवार घेऊन दहशत करत फिरणाऱ्या रेकॉर्ड वरील गुन्हेगाराला कोतवाली पोलिसांच्या पथकाने शहरातील गांधी मैदान परिसरात पकडले आहे. २६ जानेवारीला पहाटेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली आहे. जॉन कासिनो परेरा (वय ३६, रा. चंदे बेकरी जवळ, बंगाल चौकी, अ.नगर) असे या आरोपीचे नाव आहे.


रात्रीच्या वेळी हातात तलवार घेऊन फिरणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगाराला पकडल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

याबाबतची माहिती अशी की रात्रीची गस्त घालणाऱ्या कोतवाली पोलिसांना शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी फोनद्वारे कळविले की, त्यांना माहिती मिळाली आहे की, गांधी मैदान येथे जॉन कासिनो परेरा हा रेकॉर्डवरील गुन्हेगार त्याचे हातात नंगी तलवार घेवुन काहीतरी गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरत असुन तुम्ही त्याचेवर कारवाई करा, असे आदेशीत केले असता कोतवाली पोलिसांनी तत्काळ गांधी मैदान परिसरात जाऊन त्या इसमाचा शोध घेतला असता त्या ठिकाणी आडोशाला एका बंद दुकानाचे समोर एक इसम हातात नंगी लोखंडी तलवार घेऊन विनाकारण बडबड करीत थांबलेला असल्याचे दिसुन आला.

तो रेकॉर्डवरील गुन्हेगार जॉन परेरा असल्याची खात्री होताच पोलीसानी त्यास जागीच पकडले. पोलिसांनी त्यांचे हातातील एक हजार रुपये किमतीची एक नंगी लोखंडी तलवारीसह त्याला ताब्यात घेतले. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी जॉन परेरा याच्या विरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्ह्याची नोंद केली. ही कारवाई पो.नि प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो. नि. योगिता कोकाटे, पो.हे.कॉ. संदिप पितळे, विशाल दळवी, पो.कॉ. दिपक रोहोकले, तानाजी पवार, सुरज कदम, अतुल काजळे, सचिन लोळगे, संकेत धीवर यांच्या पथकाने केली आहे.

## दुचाकीसह सोन्याचे दागिन्याची चोरी

नगर - हायस्कूल समोर लावलेल्या मोपेडसह डिकीतील चाळीस हजार रुपये किमतीचे दोन तोळे वजनाच्या सोन्याच्या बांगड्या एक नॉईस कंपनीचे इलेक्ट्रिक घड्याळ कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेले. ही घटना सावेडी परिसरातील ऑक्झिलियम हायस्कूल समोर २६ जानेवारी रोजी सकाळी घडली.

याबाबतची माहिती अशी की वैभव कानिफनाथ साठे (रा. कुशाबा नगरी, गजराज फॅक्टरी समोर, भिस्तबाग चौक) यांची पत्नी त्यांच्या मुलीस शाळेतून आणण्याकरता त्यांची मोपेड (क्र. एम एच १६ ए आर ४३५) घेऊन गेल्या होत्या. त्यांनी त्यांची मोपेड रस्त्याच्या कडेला लावली होती. कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांची मोपेड चोरून नेली. या मोपेडच्या डिक्कीत त्यांनी दोन तोळे वजनाच्या सोन्याच्या बांगड्या व एक नॉईस कंपनीचे इलेक्ट्रिक घड्याळ ठेवलेले होते. चोरट्यांनी मोपेड सोबत तो ऐवजही चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## भारतीय राज्यघटनेच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी महात्मा गांधी पुतळ्यासमोर धरणे आंदोलन व निदर्शने

नगर - २६ जानेवारी १९५० पासून भारतीय राज्यघटनेचा अमल सुरू झाला. त्याची आठवण ठेवण्यासाठी दरवर्षी २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. यंदाच्या २६ जानेवारीला त्याला ७५ वर्षे पूर्ण झाली. मात्र सध्या प्रजासत्ताक हे संबोधनापुरते राहिले आहे. प्रजासत्ताकाचा गाभा असणाऱ्या कायदे मंडळाच्या निवडणुकांमध्ये अधिकृत, अनधिकृत पैशांचा प्रचंड वापर नुकताच झाला.


राज्यघटनेची काटेकोर अंमलबजावणी करावी या मागणीसाठी जिल्हा हमाल पंचायतच्या वतीने महात्मा गांधी यांच्या पुतळा येथे धरणे आंदोलन व निदर्शने करण्यात आली.

निवडणुकीसाठी वापरली जाणारी ईव्हीएम मशीनची पद्धतही संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. निवडून आल्यानंतर सत्ताधारी पक्ष आणि त्या पक्षाचे केंद्रातील सरकार यांनी घटनात्मक संस्था मोडीत काढण्याचा चंग बांधला आहे. भल्या भुऱ्या सर्व मार्गाने विरोधकांची सरकारे पाडणे, त्यांच्या नेत्यांमागे तपास यंत्रणांचा ससेमीरा लावणे. महागाई, बेरोजगारी, शेतमालाला भाव न मिळणे, शहरांचे बकालीकरण महिला, दलित, अल्पसंख्यांक यांच्यावर होत असणारे अत्याचार अशा प्रश्नांवरील लक्ष विचलित करण्यासाठी म्हणून धार्मिक विद्वेष पसरवणे. अशा प्रकारांमध्ये सरकारी पक्ष आणि त्याच्याशी संबंधित सर्व संघटना कार्यरत आहेत. पंतप्रधानांनी ११ वर्षात एकही पत्रकार परिषद घेतली नाही. संसदेत उपस्थित राहणे त्यांना महत्त्वाचे वाटत नाही. सत्ताधारी पक्षच संसद चालू देत नाही. राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी सरकार व त्याच्या पक्षातील नेत्यांच्या पोटातले ओठावर आले, त्याचा अनुभव आपण नुकताच घेतला. या सर्व परिस्थितीत प्रजासत्ताकाच्या ७५ वर्षांचा फक्त उत्सव साजरा करणे यापेक्षा प्रजासत्ताकाची व त्याचा आधार असणाऱ्या राज्यघटनेची त्यातील समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, धर्मनिरपेक्षता, समाजवाद या मूल्यांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी. याकडे लक्ष वेधण्याची कृती करणे ही काळाची गरज आहे. भारतीय संविधान हे भारतीय जनतेने स्वत:ला अर्पण करून त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी स्वतः घेतली आहे. म्हणून सरकारचे डोके ठिकाणावर ठिकाणावर आहे काय आणि राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे अशा जळजळीत शब्दात ब्रिटिश सरकारची संभावना ज्या लोकमान्य टिळकांनी केली. त्यांच्या पुतळ्यासमोर सरकारने डोके ठिकाणावर ठेवून भारतीय संविधानाची काटेकोर अंमलबजावणी करावी.

पुणे येथे सुद्धा या मागणीसाठी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली जनतेचे धरणे आंदोलन होत झाले.

अहिल्यानगर महात्मा गांधी यांच्या पुतळा येथे झालेल्या आंदोलनात जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले सहभागी झाले होते.

यावेळी कॉ. बाबा आरगडे, उपाध्यक्ष गोविंद सांगळे, शेख रज्जाक शेखलाल, सचिव मधुकर केकाण, ॲड. वैभव कदम, अनुरथ कदम, बहिरू कोतकर, रवींद्र भोसले, संजय महापुरे, लक्ष्मन वायभासे, मच्छिंद्र दहिफळे, राजू चोरमले, राहुल घोडेस्वार, बाबासाहेब गीते, रत्नाबाई आजबे, आदिनाथ चेके, शेख अब्दुल गनी, नवनाथ महानूर, श्रीमती कमल ढाणे, देविदास बनसोडे, नामदेव कुसळकर, मच्छिंद्र गिरी, अंबादास उगलमुगले, तबाजी कार्ले, आदी सह हमाल मापाडी उपस्थित होते. राज्यात ठिकठिकाणी धरणे आंदोलन झाले.

# गृहिणी

## आरोग्य

### फिटनेससाठी टाळा हे पदार्थ

फिटनेससाठी तेलकट आणि चरबीयुक्त पदार्थ आहारातून कमी करा. यामुळे फॅट तर वाढतातच शिवाय अनेक आजारांनाही आमंत्रण मिळते. जास्त मीठ असणारे पदार्थ म्हणजे सॉस, केचअप, चिप्स, पापड टाळा.

## पाककला

### मुळ्याचे कटलेट

**साहित्य** – मुळा किसलेला दोन कप, उकडलेले बटाट दोन, ब्रेडक्रब्स अर्धा कप, हिरव्या मिरच्या बारीक चिरलेल्या दोन, आले किसलेले एक टीस्पून, कोथिंबीर दोन टेबलस्पून, तिखट अर्धा टीस्पून, जिरे पूड अर्धा टीस्पून, आमसूल पावडर अर्धा टीस्पून, गरम मसाला अर्धा टीस्पून, मीठ चवीनुसार तेल

**कृती** – सर्वात आधी मुळा किसून घेऊन त्यामधील पाणी पिळून टाकावे. एका मोठ्या भांड्यात मुळ्याचा किस, मॅश केलेले बटाटे, ब्रेडक्रब्स, हिरवी मिरची, आले, कोथिंबीर आणि सर्व मसाले घालावे. मिश्रण चांगले मिक्स करा व कणकेसारखे मिसळून घ्या. आता हातांना थोडे तेल लावून कटलेटच्या आकारात टिक्की बनवा. एका पॅनमध्ये तेल गरम करून टिक्की दोन्ही बाजूंनी सोनेरी तपकिरी होईपर्यंत शॅलो फ्राय करा. तसेच जास्तीचे तेल काढण्यासाठी कटलेट्स टिश्यू पेपरवर काढा. सॉस किंवा चटणीसोबत सर्व्ह करा.

## सौंदर्य

### तजेलदार त्वचेसाठी

* रोज झोपण्यापूर्वी व सकाळी आंघोळीपूर्वी संपूर्ण शरीराला बदामाच्या तेलाने मालिश करावे. यामुळे कोरडी त्वचा तजेलदार बनते.

* एरंडीचे तेलसुद्धा खूप फायदेशीर आहे. दोन महिने रोज रात्री या तेलाने केसांना मॉलिश केल्यास टक्कल पडत नाही.

## सल्ला

मनावरच्या ताण दूर करण्यासाठी दीर्घ श्वास घ्या. हळूहळू श्वास आत घेण्याचा प्रयत्न करा. श्वास आत घेण्याचा कालावधी हळूहळू आपोआपच वाढत जाईल.

## वास्तू

दुकानाचे प्रवेशद्वार पूर्वेस किंवा उत्तरेस असावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २८ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, पू.षा.०८।५९, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २८ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल.

**वृषभ** : कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**मिथुन** : एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. वाहने व उपकरणे जपून वापरावीत.

**कर्क** : आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल. आर्थिकबाबतीत जो ताणतणाव येत होता तो जाणवणार नाही.

**सिंह** : आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील. सकारात्मक मनोवृत्तीकडे कल वाढेल.

**कन्या** : मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**तूळ** : आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल. या दिवशी नक्कीच धनस्थान मजबूत होणार आहे.

**वृश्चिक** : इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**धनु** : कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**मकर** : आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल. पौर्णिमा धनस्थानातून होत आहे.

**कुंभ** : एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**मीन** : चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल. जुने वादविवाद टाळा. आरोग्य चांगले राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

## कुठे जाऊ

श्रीपादरावांची बायको प्रकृती बरी नाही म्हणून डॉक्टरांकडे गेली होती. घरी आल्यावर ती श्रीपादरावांना म्हणाली, ''डॉक्टरांनी माझी प्रकृती तपासली. पौष्टिक आहार घ्या. थंड हवेच्या ठिकाणी जाऊन रहा असे डॉक्टरांनी सांगितले आहे.''


''बर मग?'' पतिराज़ उद्गारले '

'मी काय करू? कुठे जाऊ? तुम्हीच सांगा'' पत्नी म्हणाली.

''दुसऱ्या एखाद्या डॉक्टरकडे जा'' श्रीपादराव थंडपणे म्हणाले.

# शब्दगंध क्र. ७१०१

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) समुद्रातील गुळगुळीत गोल दगड; गजगा ५) सरपटणारा एक जीव ज्यातील काही जाती विषारीही असतात ७) यावर्षी ८) ज्याला गरज आहे असा १०) कोणतेही सामान; धान्य ११) वडिलोपार्जित चालत आलेली जमीन वगैरे मालमत्ता १२) ठाण; दोरा; ठिकाण; पत्ता १४) भाषेचा एक अलंकार १७) ओकारी; उलटी; वांती १८) कामबंद आंदोलन; हरताळ १९) एक पक्षी; पोपट; कीर २०) स्वातंत्र्य; मुभा २१) ताजातवाना; चलाख; हुशार २२) उपहास; फजिती; हुर्यो

### शब्दगंध क्र. ७१०० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| त | ज | वी | ज | ■ | ग | वा | क्ष |
| ळ | ■ | ज | ळ | ज | ळी | त | ■ |
| प | र्ण | ■ | गा | ■ | त | ड | क |
| ट | ■ | डा | व | रा | ■ | ■ | ठी |
| ■ | सा | ग | ■ | ग | त | प्रा | ण |
| र | म | णी | य | ■ | क | ण | ■ |
| सा | सू | ■ | म | ना | ली | ■ | घो |
| ■ | म | द्य | ■ | म | फ | ल | र |

**उभे शब्द :-** १) संध्याकाळ; कातरवेळ २) हनुमानाचे शस्त्र ३) एक छोटा निरुपद्रवी जीव ४) घोडा; अश्व; वारू ५) एक मराठी आडनाव ६) पडणे; नाश; पात ९) निकटपणा; नजीकपणा १०) आई; जननी; माय १३) आठवड्यातील एक दिवस १५) एक प्रकारचे रत्न १६) पळाल्यावर वगैरे जोराचा श्वासोच्छ्वास होतो तो १७) लग्नानंतर निघणारी वधुवराची मिरवणूक १८) अरिष्ट; बला; आपत्ती २०) घरातील सांडपाणी काढून देण्याची वाट

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : दुसऱ्यांच्या दुःखात भागीदार व्हावयास शिकणे हेच खरे शिक्षण होय. – **गौतम बुद्ध**

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## सोललेल्या पाकळ्या की संपूर्ण लसूण कोणता प्रकार खरेदी करावा?

लसूण जेवणाची चव वाढवतो हे आपल्या सर्वांना माहित आहे. ते चविष्ट असण्यासोबतच आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. बरेच लोक लसणापासून पदार्थ आणि लोणचे देखील बनवतात. म्हणूनच लसूण वर्षभर बाजारात उपलब्ध असतो. पण लसूण खरेदी करताना, योग्य आणि ताजे लसूण निवडणे खूप महत्वाचे आहे. यामुळे अन्नाच्या गुणवत्तेवरच परिणाम होत नाही तर त्याचे पौष्टिक मूल्य देखील टिकून राहते. जरी आपण लसूण सहज खरेदी करतो, परंतु कधीकधी आपल्याला विचार करावा लागतो की आपण संपूर्ण लसूण खरेदी करावे की सोललेल्या पाकळ्या?

जरी दोन्ही प्रकारचे लसूण उपयुक्त असले तरी, संपूर्ण लसूण खरेदी करण्याचे आपले फायदे आहेत. संपूर्ण लसूण जास्त काळ ताजे राहते. योग्यरित्या साठवल्यास ते अनेक महिने वापरले जाऊ शकते. संपूर्ण लसणात सैल किंवा कोरड्या पाकळ्या सहज ओळखता येतात. संपूर्ण लसूण अधिक तीव्र आणि खोल चवीचा असतो, जो पदार्थांना एक अद्भुत चव देतो. ते वापरण्याचे अनेक फायदे असू शकतात. पहिली गोष्ट म्हणजे ते आधीच सोललेले आहे, ज्यामुळे ते वापरण्यास खूप सोपे होते. हे फोडणीसाठी सर्वोत्तम आहे, परंतु सोललेल्या लसूण पाकळ्या लवकर खराब होऊ शकतात. तसेच ते कशा प्रकारे सोलण्यात आले आहे ते माहित नसल्यामुळे गुणवत्तेबद्दल नेहमीच प्रश्न असतो. तसेच त्यातून खराब कळ्या काढणे कठीण आहे. म्हणून बाजारातून ते कमी प्रमाणात विकत घेणे आणि वापरणे चांगले.

ताजे आणि चांगल्या दर्जाचे लसूण ओळखण्यासाठी, त्याच्या आकार आणि वजनाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी प्रथम तुमच्या हातात लसूण उचलण्याचा प्रयत्न करा. ते जड आणि घट्ट वाटले पाहिजे. त्याच वेळी, आतून हलका आणि पोकळ वाटणारा लसूण अनेकदा कोरडा किंवा खराब होऊ शकतो.

लसणाची एक संपूर्ण पाकळी व्यवस्थित भरलेली हवी. लसणाचा आकार पाहताच, जर त्या पाकळ्या एकमेकांना चिकटल्या किंवा आकुंचन पावल्या असतील तर त्या खरेदी करू नका. मोठा आणि जड लसूण खरेदी करणे म्हणजे ते सर्वोत्तम आहे असे नाही. नेहमी ताजेपणा आणि चवीनुसार निवडा. लसूण खरेदी करण्यापूर्वी त्याच्या सालीकडेही लक्ष दिले पाहिजे. लसणाची ताजीपणा अनेकदा त्याच्या सालीवरून ठरवता येते. लसणाची साल स्वच्छ आणि कोरडी असावी याची नोंद घ्या. सैल किंवा सोललेली त्वचा खराब लसूण असू शकते. त्याच वेळी, जर लसणाची साल ओली किंवा चिकट वाटत असेल तर ती खरेदी करणे टाळा. ओल्या सालीमुळे लसूण व्यवस्थित साठवला गेला नाही आणि लवकरच खराब होऊ शकतो.

लसूण खरेदी करताना, कळ्यांकडे देखील लक्ष द्या. लसणाच्या पाकळ्या जाड आणि भरलेल्या असाव्यात. जर लसूण पाकळ्या सुकलेल्या किंवा लहान दिसत असतील तर ते जुने किंवा खराब झालेले असू शकते. याव्यतिरिक्त, कळ्या सालीने चांगले लेपित असाव्यात. साल नसलेल्या किंवा साल सैल नसलेल्या कळ्या लवकर खराब होऊ शकतात. जर कळ्यांमधून हिरवे कोंब येत असतील तर ते खरेदी करू नका. कारण अंकुरलेला लसूण कडू चवीचा असू शकतो आणि त्याचा ताजेपणा देखील कमी होतो. लसूण खरेदी करताना सर्वात मोठी समस्या म्हणजे संपूर्ण लसूण घ्यायचा की पाकळ्या. दोघांचेही स्वतःचे फायदे आणि तोटे आहेत आणि त्यांची निवड तुमच्या वापरावर अवलंबून असते.

## राजाची प्रेमकथा

अनेक वर्षांपूर्वी शिवनगरवर राजा नाथांचे राज्य होते. राजाला तीन राण्या होत्या. राजाला त्याच्या तीन बायकांपैकी पहिली पत्नी सर्वात जास्त प्रिय होती, कारण ती खूप सुंदर होती. तसेच तिच्या सौंदर्यामुळे राजा आपल्या दुसऱ्या आणि तिसऱ्या पत्नीकडे लक्ष देऊ शकत नव्हता. त्याने आपल्या दुसऱ्या पत्नीला मित्र मानले आणि तिसऱ्या पत्नीकडे लक्ष दिले नाही. तसेच इकडे राजाच्या तिसऱ्या बायकोचे त्याच्यावर खूप प्रेम होते, पण राजाला तिसऱ्या राणीचे प्रेम कधीच दिसले नाही. बरीच वर्षे उलटून गेली. राजाची तिसरी पत्नी आज राजा आपल्याकडे पाहतील या आशेवर रोज जगत असे. पण असं कधीच घडलं नाही.

अशीच काही वर्षे गेली. एके दिवशी राजा नाथ अचानक गंभीर आजारी पडला. त्याची तब्येत हळूहळू खालावत गेली आणि जगण्याची शक्यता कमी झाली. मग राजाने आपल्या पहिल्या पत्नीला बोलावले. जेव्हा राजाची पहिली पत्नी राजाकडे आली तेव्हा राजाने तिला विचारले की ''माझी जगण्याची शक्यता खूप कमी झाली आहे आणि मला एकट्याने देवाकडे जायचे नाही, तू माझ्याबरोबर येशील का?'' राजाचे म्हणणे ऐकून राणीने त्याच्यासोबत जाण्यास नकार दिला आणि सांगितले की तिला अजून आयुष्य बाकी आहे आणि तिला अजून जगायचे आहे. असे बोलून पहिली राणी राजाच्या खोलीतून बाहेर पडली.

मग राजा दुसऱ्या राणीला बोलवायला सांगतो. जेव्हा दुसऱ्या राणीला समजले की राजा त्याच्या शेवटच्या क्षणी आहे आणि त्याला आपल्या पत्नीला सोबत घेऊन जायचे आहे, तेव्हा तिने राजाजवळ जाण्यास नकार दिला. आपल्या दोन्ही प्रिय राण्यांबद्दल निराश झालेल्या राजाने विचार केला की मी माझ्या तिसऱ्या पत्नीला कधीच वेळ दिला नाही आणि तिच्यावर प्रेमही दाखवले नाही. आता मी तिला कसे बोलावू? राजा असा विचार करत होता, तेवढ्यात तिसरी राणी न बोलावता राजाकडे आली. तिसऱ्या राणीला राजाची इच्छा माहीत असल्याने ती थेट राजाला सांगते,

''महाराज, मी तुमच्यासोबत यायला तयार आहे.'' राणीचे म्हणणे ऐकून राजाला खूप आनंद झाला. त्याच वेळी, तो निराश झाला की त्याने आयुष्यभर त्या राणीकडे आपले प्रेम योग्यरित्या व्यक्त केले नाही, परंतु तिने त्याच्यावर सर्वात जास्त प्रेम केले. त्याच वेळी, राजगुरू एक प्रसिद्ध वैद्य घेऊन येतात, जो राजाची तब्येत बरी करतो. राजा बरा होताच, त्याने तिसऱ्या राणीवर प्रेम करायला सुरुवात केली. राजाने आपल्या तिसऱ्या राणीला नेहमी जवळ ठेवले आणि ते दोघेही राजवाड्यात सुखाने राहू लागले.

तात्पर्य : कधीही सौंदर्यावर प्रेम करू नये, तर हृदयावर आणि आचरणावर प्रेम केले पाहिजे.



# रहमते दर्शन (भाग – १)

## मेरे मेहेरबान

पत्रिका मिलने पर हम बहुत खुश हुए और उसे महाराज जी को दे दिया।जुलाई १९८० की बात है कि एक बार मैं घर से आश्रम आ रहा था । मैं मौरिस नगर बस से उतरा। उस समय वर्षा नहीं हो रही थी। रास्ते में मूसलाधार वर्षा शुरू हो गई। मौरिस नगर और आश्रम के बीच का रास्ता कमर तक पानी में भर गया। मैं ठिठक गया और निर्णय नहीं ले पा रहा था कि क्या करूँ, क्या न करूँ? इस बीच उस बस का चालक, जिसमें मैंने सफर किया था, मेरे पास आकर कहने लगा कि आप परेशान न हों और आकर बस में बैठ जायें। उसने मुझे कहा कि मैं तुम्हें आश्रम के समीप ही नाले के पुल पर उतार दूँगा। मैं उसके प्रति बहुत कृतज्ञ हुआ। जब मैं आश्रम में पहुँचा, तो मैंने महाराज जी को इधर से उधर टहलते हुए पाया, जैसे वे मेरी ही प्रतीक्षा कर रहे हों। मुझे देख कर वे बोले 'आप ठीक तो हैं और क्या आपको कपड़े बदलने की ज़रूरत है? मैंने उन्हें बताया, आपने ड्राइवर के वेष में आकर मुझे पुल तक छोड़ दिया और डूबने से बचा लिया। वे हँस पड़े।

ये प्रभु रूप हस्तियाँ सावन, कृपाल, दर्शन और राजिन्दर दया, प्यार और विनम्रता के पुंज होते हैं और हम पर की गई दया-मेहर का श्रेय स्वयं न लेकर अपने गुरु को दे देते हैं। मेरे पास उनका धन्यवाद देने के लिए कोई शब्द नहीं हैं।

### पिता पूत एके रंग लीन्हे

तेरे करम से आँख को क्या-क्या दिखाई दे।
बेटे में बाप, बाप में बेटा दिखाई दे।।

एक बार का ज़िक्र है, मैं महाराज दर्शनसिंह जी का सत्संग बड़े प्यार से सुन रहा था तथा उसी प्यार से उनके चेहरे को भी देख रहा था। मैंने क्या देखा कि महाराज दर्शनसिंह का चेहरा, मेरे गुरुदेव महाराज कृपालसिंह जी में बदल गया तथा पगड़ी भी बदल गयी। ये अनुभव थोड़े समय तक चला। उसी दृश्य को देखने के लिए आज भी मेरी आँखें तरसती हैं। शायद ये सौभाग्य फिर कभी मिले।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

लिये सीखते रहना है, अपनी योग्यता बढानी है, दूसरे विकास करते रहना है, परिवर्तन भी करते रहना है। अगर हमारे पास अपने जीवन के लिये कोई योजना और उद्देश्य नहीं है तो हम किसी दूसरे की योजना और उद्देश्य का हिस्सा बन जाएंगे। आप ने चाहे कितने भी मानसिक आघात सहे हों या कितनी भी बड़ी गलतियां की हों, आप तब भी विकास कर सकते हैं। आप के साकारात्मक विचार, स्वयं पर अनुशासन और निरन्तरता का अभ्यास आप को अपनी मंजिल पर पहुंचा देगा। पहला साकारात्मक विचार अर्थात अपने गुणों की सूची बनाए। कम से कम अपने १०० गुण लिखो। आप अपने बारे अच्छी चीजे कितनी सोचते हैं। वह सब लिख लो। कहीं भी रहो मन ही मन अपने गुणों को रिपीट करते रहो। मुख से नहीं बोलना। मुख से बोलोगे तो दूसरे आप की आलोचना करेंगे। आप के आगे विघ्न डालेंगे। दूसरा अपने पर अनुशासन यह रखना है कि आप दूसरों के बारे अच्छा सोचेंगे चाहे वह कैसे भी हो।

## दिमाग की शक्ती

जब दूसरों के बारे अच्छा सोचेंगे तो आप अपने बारे कभी बुरा नहीं सोच सकते।

दूसरों को जब आप मन से लाभान्वित करेगें तो आप को अपने बारे अच्छा महसूस होगा। तीसरा दिमाग को विकसित करने के लिये निरन्तरता की भी जरूरत होती है। हम हर रोज क्लास करते हैं। कोई अच्छा वक्ता मधुबन या किसी अन्य स्थान से आता है तो उसके प्रवचन से हमें बहुत प्रेरणा मिलती है। हम तरंगित हो जाते हैं। और सोचते हैं यह करेंगे वह करेंगे। श्रेष्ट वक्ताओं से मिला उमंग उत्साह ज्यादा समय तक नहीं चलता। प्रत्येक व्यक्ति हर रोज प्रेरित होना चाहता है। क्योंकि व्यक्ति को प्रेरित होने में आनंद आता है। लेकिन व्यक्तिगत विकास के मामले में सच्चाई यह है कि प्रोत्साहन आप से सिर्फ शुरू कराता है लेकिन निरन्तरता से आप का विकास होता है। चाहे आप कितने गुणी हों, चाहे कितने अच्छा वक्ता हों, मोटीवेशनल वक्ता हों, कितने ही महान योगी के साथ रहते हों या रहे हों इस से परिवर्तन नहीं आता। यदि आप विकास करना चाहते हैं तो निरन्तरता ही विकास की कुंजी है अर्थात हर रोज वह करना है जो आप चाहते हैं। हम एक ही झटके में बड़ा लक्ष्य पाना चाहते हैं, वह होता नहीं, इस लिये प्रयास ही छोड़ देते हैं। आप अपना वजन घटाना चाहते है। आप सैर शुरू करते हैं। आप १०-१५ दिन सैर करते हैं। इस से वजन कम नहीं हुआ, आप सैर करना ही छोड़ देते हैं। आप लम्बे समय तक एक साल, दो साल या जीवन भर सैर करें तब वजन कम होगा और नियन्त्रण में होगा। आप संगीत सम्राट बनना चाहते हैं। एक दो मास में कुछ नहीं होगा। आप अभ्यास छोड़ देते हैं। आप संगीत सम्राट तभी बनेगें जब हर रोज १०-१५ साल अभ्यास करेंगे।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

**स्तनपानाची पध्दत :** स्तनपानातून बाळाची शारीरिक, मानसिक व बौद्धिक वाढ होऊन त्याचे पोषण होते. म्हणून स्तनपान हे केवळ शारीरिक क्रिया नसावी तर ती मनापासून प्रेमाने, केलेली क्रिया असावी. याकरिताच आईने खूप प्रेमाने शांत चित्ताने व प्रसन्न मनाने मुलाला पाजणे आवश्यक असते. मोठ्याने बोलत असताना किंवा रागावत असताना स्तनपान करू नये. घाईघाईने, रागारागाने 'स्तनपान हे एक काम' अशा भावनेने स्तनपान करू नये; यामुळे आईच्या दुधातून मिळणारे फायदे बाळाला मिळत नाही. स्तनपान करताना प्रथमतः

## नवजात बालकाची परिचर्या

स्तन व स्तनाग्रे कोमट पाण्याने धुवून घ्यावीत व नंतर सुती कपड्याने पुसावीत. प्रथमत: उजवा स्तन व नंतर डाव्या स्तनातून दूध घ्यावीत व नंतर सूती कपड्याने पुसावीत प्रथमत: उजवा स्तन व नंतर डाव्या स्तनातून की पाजावे. स्तनपान करताना शक्यतो मांडी घालून बसावे. बाळाला मांडीवर झोपवून बाळाचे हात हातात घ्यावे व स्तनपान करावे. जर स्तन फार मोठे, वजनदार असतील, तर स्तनपान करताना नाने शोटे उचलावे म्हणजे बाळाला दूध व्यवस्थित पिता येते. प्रथमतः उजव्या स्तनात दूध संपेपर्यंत पाजून मग नंतर डाव्या स्तनातील दूध पाजावे. नवजात बालकाला प्रथमतः १ मिनिटे उजव्या व ५ मिनिटे डाव्या बाजूला स्तनपान करावे. हळूहळू वेळ वाढवत १० ते मिनिटे करावी. स्तनातील शेवटच्या दूधामध्ये मलईचा भाग अधिक असतो;

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिनी चँपियन बॅनर प्रदान करताना दैनिक नवा मराठाचे संपादक सभाष गुंदेचा.

# माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलमध्ये कंपनीने पटकाविला चँपियन बॅनर

नगर – सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात झाला. अहमदनगर येथील दैनिक नवा मराठाचे संपादक सभाष गुंदेचा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रारंभी सिनाय कॅडट फोर्सच्या छात्रांनी परेड कमांडर श्रृष्टी पोकळे हिच्या नेतृत्वाखाली नेत्रदिपक संचलन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

प्रारंभी मुख्याध्यापिका जयश्री खरात यांनी देशासाठी प्रार्थना केली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुभाष गुंदेचा यांच्या हस्ते या वर्षाचा चँपियन बॅनर व प्रथम क्रमांकाचा चषक किंग डेव्हिड कंपनीचा कंपनी सिनियर अजिंक्य कंठाळे व श्रुष्टी पोकळे यांना प्रदान करण्यात आला. राणी लक्ष्मीबाई कंपनी व छत्रपती शिवाजी कंपनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक चषकाचे मानकरी ठरले. त्याचप्रमाणे या वर्षाचा उत्कृष्ट खेळाडू म्हणून साक्षी राठोड व चैतन्य आवारे यांना गौरविण्यात आले. या प्रसंगी अथर्व शिंदे, आर्वी शिंदे, देवांश फसले, क्रिती उबाळे, प्रांजल शेडाळे, स्वराज इंगळे, ओमकार कुटे, हर्ष विधाते, शिवराज विधाते, उत्कर्ष गोराने, आरोही कराळे, अरीज शेख व नुतन कोहक या विद्यार्थ्यांची समयोचित भाषणे झाली. प्रमुख पाहुणे या नात्याने बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्धतेचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाला विद्यालयाचे संस्थापक डॉ. शाम खरात, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उज्वला पंडित यांनी केले तर आभार अर्चना केदार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेहा केदारे, सविता पाटोळे, रेणुका बानिया, कविता आढाव व किशोर उबाळे यांनी परिश्रम घेतले.

# केमिस्ट असोसिएशन आयोजित शिबिरात १६०८ बांधवानी केले रक्तदान

नगर – अहिल्यानगर जिल्हा व शहर केमिस्ट असोसिएशनच्या वतीने शहरासह संपूर्ण जिल्ह्यात रक्तदान शिबिर राबविण्यात आले. महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनच्या माध्यमातून जगन्नाथ (आप्पासाहेब) शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १६०८ केमिस्ट रक्तदात्यांनी रक्तदान करुन समाजाप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली. तालुकास्तरावर झालेल्या शिबिरात केमिस्ट बांधवांचा प्रतिसाद लाभला.



अहिल्यानगर जिल्हा व शहर केमिस्ट असोसिएशनच्या वतीने शहरासह संपूर्ण जिल्ह्यात रक्तदान शिबिर राबविण्यात आले. महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनच्या माध्यमातून जगन्नाथ (आप्पासाहेब) शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शहरात ७ ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन अन्न व औषध प्रशासनचे सहाय्यक आयुक्त अशोक बर्डे यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर, सचिव सोमानी मनीष, भरत सुपेकर, मनोज खेडकर, महेश आठरे, एमएसएमआरएचे अध्यक्ष किरण वाळके, प्रमोद सोळंकी, अभय गुगळे, जयंत रंगा, संजय गुगळे, अशोक बलदोटा, राजेंद्र बलदोटा, अनिल गांधी, संजय गुंदेचा, आशुतोष कुकडे, संदीप कोकाटे, रुपेश भंडारी, कमलेश गुंदेचा, सुधाकर बोरुडे, अमित धाडगे, महेश अनमल, अविनाश साळुंके, महेंद्र अनमल, एमआरए संघटनेचे दीपक पापडेजा, मिलिंद क्षीरसागर, नितीन सातपुते, राजेंद्र बेद्रे, युवराज खेडकर, अवधूत बोरुडे, संकेत गुंदेचा, आदेश जाधव, सागर फुलसौंदर, अनिल क्षीरसागर, अभिजीत गांगर्डे, विशाल नातू, महेंद्र राऊत, विनोद गांधी, ज्ञानेश्वर यादव आदींसह केमिस्ट बांधव, केमिस्ट कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार, दुकानातील कर्मचारी, औषध विक्री सभासद व संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

अशोक बर्डे म्हणाले की, केमिस्ट असोसिएशन देश पातळीवर सामाजिक भावनेने काम करत आहे. जिल्ह्यात केमिस्ट बांधवांनी राबविलेले सामाजिक उपक्रम दिशादर्शक आहे. व्यवसाय करुन सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य केमिस्ट बांधव करत आहे. रक्तदान ही गरजू रुग्णांना जीवदान ठरणारी चळवळ आहे. रक्तासाठी मनुष्याला मनुष्यावरच अवलंबून रहावे लागत आहे. या सामाजिक चळवळमध्ये प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे आहे. रक्तदानासाठी केमिस्ट असोसिएशनचा पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

दत्ता गाडळकर म्हणाले की, केमिस्ट असोसिएशनच्या माध्यमातून राज्यातील सर्व झोनमधील सर्व जिल्ह्यांमध्ये शहरासह तालुकास्तरावर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. राज्यात एकाच दिवशी ७५ हजार पेक्षा जास्त रक्तदात्यांचे रक्त संकलन करण्यात आलेले आहे. राज्यातील रक्ताचा तुटवडा भरून काढण्याच्या उद्देशाने जगन्नाथ (आप्पासाहेब) शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. केमिस्ट असोसिएशन सेवाभावाने विविध सामाजिक उपक्रम राबवीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शहर व जिल्ह्यात झालेले रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी ए.आय.ओ.सी.डी.ए. निमंत्रित सदस्य अजित पारख, जिल्हा सचिव आबासाहेब बेदरे, खजिनदार प्रशांत उबाळे, जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले.

# 'आनंदऋषी नेत्रालय' येथे रिक्षा स्टॉपचा शुभारंभ

नगर – अहमदनगर जिल्हा ऑटो रिक्षा टॅक्सी चालक–मालक संघटनेच्या वतीने आनंदऋषी नेत्रालय येथे रिक्षा स्टॉपचे शुभारंभ संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले व उपाध्यक्ष दत्ता वामन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष विलास कराळे, अशोक औशिकर, गणेश आटोळे, बाबा आरगडे, नासीर भाई, सुधाकर साळवे, लतिफ भाई, आनंदऋषीजी नेत्रालय ऑटो रिक्षा स्टॉपचे अध्यक्ष आशिष दांगडे, उपाध्यक्ष बाळासाहेब चाबुकस्वार, छबुराव बोरुडे, संजय पाटोळे, दिनेश दहिंडे, अजय पवार, सुभाष तळेकर, संदीप गोंधळे, प्रकाश चौधरी, प्रभाकर कांबळे, पै.शंकर दांगडे, शेख मोसिन, रविंद्र बडेकर, शरद वाकचौरे, शामराव कांबळे आदी उपस्थित होते.



अहमदनगर जिल्हा ऑटो रिक्षा टॅक्सी चालक–मालक संघटनेच्या वतीने आनंदऋषी नेत्रालय येथे रिक्षा स्टॉपचे शुभारंभ संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले व उपाध्यक्ष दत्ता वामन यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले म्हणाले की, रिक्षा चालकांचे प्रश्न संघटनेच्या मार्फत सोडविले जाणार असून रिक्षावाल्यांना न्याय मिळतो त्यामुळे संघटनेत वाढ होऊ लागली आहे. संघटनेचे सभासदांना जेथे अडीअडचण होईल आरटीओ, ट्राफिक व थांबयाचा प्रश्न असेल त्यामागे संघटना खंबीरपणे उभे राहुल संघटनेमार्फत सोडविले जाणार तसेच रिक्षा चालकांचे आले असून रिक्षा चालकांच्या प्रलंबित प्रश्न कल्याणकारी मंडळाचे खाते उघडण्यात आलेले नसून त्या प्रश्नासाठी देखील आमदार संग्राम जगताप व संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले यांच्यामार्फत मंत्रालयात बैठक घेऊन व पाठपुरावा करून प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावणार असल्याचे सांगितले.

अपूर्ण प्रश्न आहे कल्याणकारी मंडळाचा प्रश्न व लेट फी प्रश्न हे आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सोडवणार असल्याची भावना व्यक्त करत जेथे रिक्षा चालकांवर अन्याय होणार तेथे संघटना उभी राहणार असल्याची भावना व्यक्त केली.

उपाध्यक्ष दत्ता वामन म्हणाले की, अहमदनगर जिल्हा ऑटो रिक्षा चालक–मालक संघटनेच्या वतीने आनंदऋषी नेत्रालय येथे रिक्षा स्टॉपचे शुभारंभ करण्यात

# कार्तिक मिश्रा याची खेलो इंडिया अंतर्गत 'आईस हॉकी स्केटिंग स्पर्धे'साठी निवड

नगर – शहरातील खेळाडू स्केटिंग कार्तिक रत्नेश मिश्रा याची खेलो इंडिया स्पर्धेत आईस हॉकी स्केटिंग प्रकारात निवड झाली आहे. नुकतेच पुणे येथे आईस हॉकी स्केटिंग स्पर्धेची निवड चाचणी पार पडली. यामध्ये उत्कृष्ट प्रदर्शन केल्याबद्दल मिश्रा यांची लेह लदाख येथे होणाऱ्या खेलो इंडिया अंतर्गत आईस हॉकी स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यापूर्वी देखील मिश्रा याने दुबई येथे झालेल्या साऊथ एशियन गेम्स मध्ये स्केटिंगमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करून उत्कृष्ट प्रदर्शन केले होते.



मिश्रा हा शहरातील ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूल व पॉलीटेक्निकचा माजी विद्यार्थी आहे. स्केटिंगचे दिवंगत प्रशिक्षक मनोज करपे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने स्केटिंगचे धडे गिरवले आहे. सध्या तो स्वत: सराव करत असून, भारती विद्यापीठ पुणे येथे सिव्हिल इंजिनिअरिंगचे शेवटच्या वर्षात शिक्षण घेत आहे. पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर पदक पटकाविणाऱ्या अनुराधा मिश्रा यांचा तो मुलगा आहे. मिश्रा यांची निवड झाल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी गौरव कराळे उपस्थित होते.

# श्री आनंद पार्श्व गुरुकुलाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

नगर – केडगाव, अकोळनेर रोडवरील आनंद नवकार परिवार ट्रस्ट संचालित श्री आनंद पार्श्व गुरुकुलाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी म. चे अंतर सुशीष्य श्रमण संघीय युवाचार्य श्री महेंद्रऋषीजी म, महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषीजी म. इत्यादी संत – सती वृंदांच्या पावन सानिध्यात, श्रावक – श्राविकांच्या उपस्थितीत १९ जानेवारी रोजी झाला. श्री हितेंद्रऋषीजी म., श्री आलोकऋषीजी म. यांचे मंगलाचरण व स्त्रोत पठण केले. श्री आनंद पार्श्व गुरुकुलाच्या मुला – मुलींनी स्वागत गीत प्रस्तुत केले. साध्वीजी श्री नाव्याजी म. यांनी युवाचार्यश्रीजी व प्रवर्तकश्रीजी यांचे स्वागत व गुरुकुलाचे महत्व एका भजनाद्वारे प्रस्तुत केले. उपप्रवर्तिनी श्री रिद्धीमाजी म. व श्री आराधनाजी म. यांनी गुरुकुलाचे महत्व तसेच प्रवर्तकश्रीजी श्री आलोकऋषीजी म.स यांच्या कार्याचे गोड कौतुक केले. डॉ. श्री पुण्यशिलाजी म. यांनी काळाची गरज गुरुकुल या विषयावर भजनाद्वारे प्रकाश टाकला. डॉ. श्री जोस्नाजी म. यांनी संस्कार काळाची गरज आहे सांगून हे गुरुकुल खूप मोठी भरारी घेईल असे आपल्या भाषणातून सांगितले. स्कूल कमिटी मेंबर सौ. मेघा बोरा यांनी शाळेची माहिती देऊन, मुलांच्या सर्वांगीण विकासाची हमी दिली. दोन पालकांनी आपल्या मुलांच्या सर्वांगीण विकास हेतू प्रिन्सिपल, टीचर्स एवं शाळेचे अभिनंदन केले.

संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अशोककुमार पगारिया यांनी आपल्या प्रास्ताविकात संस्थेची स्थापनेपासूनची माहिती सांगुन संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली व आनंद पार्श्व गुरुकुलच्या स्थापनेमागील उद्देश सांगितले

गुरुकुलाचे प्रमुख सहयोगी रमणलाल लुंकड (औंध, पुणे)



श्री आनंद पार्श्व गुरुकुलाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन संत – सती वृंदांच्या पावन सानिध्यात करण्यात आले.

गुरुकुल चे उद्घाटक अशोक कटारिया यांचा विशेष सत्कार करण्यात आला. श्रीमती सुजाता राजेंद्र लोढ़ा (अ. नगर), संस्थेचे अध्यक्ष अशोक पारख (अ. नगर), डॉ. प्रकाश, सौ. सुधा कांकरिया, (अ.नगर), सीए. रवींद्र कटारिया (अ.नगर), सौ. मंजू सुनील मुनोत (अ.नगर), सुनील ओस्तवाल (कारेगाव) यांचा हार व मोमेंट देऊन ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला.

श्री आलोकऋषीजी म. यांनी सांगितले की, ही सर्व कृपा आनंदबाबांची व तपस्वी मगनमुनिजी म. यांची आहे. प्रवर्तक श्री कुंदनऋषीजी म यांची सतत प्रेरणा, युवाचार्यश्रीजी व प्रवृद्ध विचारक आदर्शऋषीजी म. यांचे मार्गदर्शनाने तसेच संस्कार, सेवा, शिक्षा यांच्या त्रिवेणी संगमाने गुरुकुल उंच भरारी घेत आहे. श्री हितेंद्रऋषीजी म. यांनी सांगितले की कमीवयात श्री आलोकऋषीजी म. हे गुरुदेवांचे स्वप्न साकार करत आहे. प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषीजी म यांनी सांगितले की, शिक्षण हे अंधकारपासून प्रकाशाकडे गतिशील राहण्याचा मार्ग आहे. गुरुकुल चे कार्य प्रगतीपथावर निरंतर गतिमान राहो अशी सद्भावना त्यांनी पत्राद्वारे व्यक्त केली.

प्रवर्तकश्रीजीने संगीतले कि, णाण हे मनुष्याचे तिसरे नेत्र आहे. जैन समाजाच्या प्रत्येक मुला – मुलींनी या गुरुकुलमध्ये प्रवेश घेऊन यांच्या भविष्यात बाबत निश्चित व्हावे असे सांगितले. श्रमण संघीय युवाचार्य श्री महेंद्रऋषीजी म. यांनी ज्ञानाचे खुप महत्त्व आजच्या युगात आहे, असे सांगितले. आजच्या युगात ज्ञान मंदिराची, आरोग्याच्या मंदिराची नितांत आवश्यकता आहे असे ते म्हणाले.

दीक्षार्थी शिवम बाफना (वडगाव मावळ) तसेच वैरागवती कुमारी जीया व कुमारी खुशी जैन यांचे स्वागत ट्रस्ट व कमिटीच्या सदस्यांनी केले.

मद्रास, बेंगलोर, मध्यप्रदेश, मुंबई, महाराष्ट्र इत्यादी उपस्थित होते, अशी माहिती आनंद नवकार परिवार ट्रस्ट, सलाहकार कमिटी व विश्वस्त मंडळ व स्कूल कमिटीकडून देण्यात आली. सर्वांनी या गुरुकुलात प्रवेश निश्चित करावा असे निवेदन करण्यात आले आहे.

खासदार निलेश लंके, विजयकांत कोठारी, पोपटलाल ओस्तवाल, राजकुमार चोरडिया, विपुल शेटीया, संजय चोपडा, श्रीमती सुजाता राजेंद्र लोढा, पारस मोदी, अविनाश चोरडिया, रमेश फिरोदिया, किरण बोरा, डॉ. प्रकाश, डॉ. सौ. सुधा कांकरिया, राजेंद्र कोठाडीया, पेमभाऊ बोथरा, रवींद्र कटारिया, आनंदराम मुनोत, विलास राठोड, शांतीलाल बोरा, दिपक मुनोत (पत्रकार), सतिश लोढा, नितीन बेदमुथा, विलास पगारिया, विकास कांकरिया, रुचिरा सुराणा, विमला बाफना, लता पगारिया, नितल फुलफगर, शैलेश पगारिया, विजय ओस्तवाल, सुरेश पीचा, संतोष बोथरा, राजेंद्र बोरा, अशोक मोहनलाल भंडारी, विलास मुथा इ. उपस्थित होते. आर्किटेक किरण कांकरिया, इंजिनिअर धनेश मुनोत, श्री. गुलाटी, सचिन डागा उपस्थित होते.


गौतम प्रसादीची व्यवस्था सौ. अलकाबाई सुनिल कांकरिया (कोल्हार भ.), श्रीमती मंगलाबाई नंदकुमार राका (चिंचोली फाटा), श्रीमती प्रमिलाबाई वसंटलाल भटेवरा (कोल्हार भ – राहू) करण्यात आली होती.

आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष सीए मोहनलाल बरमेचा (अहमदनगर) यांनी केले. प्रा. डॉ. अशोक पगारिया व प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेचे विश्वस्त व स्कूल कमिटीचे राजकुमार लुनिया, सुनील बाफना, महेश मुथियान, मनोज शेटिया, संदेश लोढा, राजेंद्र छल्लाणी, राजेंद्र चोपडा, प्रितेश दुगड, ईश्वर धोका, संतोष बाफना, सुदर्शन डुंगरवाल, सचिन बोरा, गणेश आनंद शिंगी, रोशन चोरडिया, सौ. मेघा बोरा, श्रीमती इच्छाबाई बोरा, प्रिन्सिपॉल मोना मॅडम, ज्योती पुरी मॅडम इ. चे सहयोग मिळाले.

# महाराष्ट्र केसरी स्पर्धा जिल्ह्याचा नावलौकिक वाढवणारी ठरेल

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे प्रतिपादन; वाडियापार्क मैदानाची केली पाहणी


नगर – अहिल्यानगर शहरात महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा होत असल्याचा आनंद मला झाला आहे. जिल्ह्याला कुस्ती क्षेत्राचा मोठा ऐतिहासिक व वैभवशाली वारसा लाभला आहे. हा वारसा आता आ.संग्राम जगताप महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या माध्यमातून पुढे नेत आहेत. नगर शहरात पहिल्यांदाच या मोठ्या स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन केले जात आहे. ही स्पर्धा जिल्ह्याचा नावलौकिक वाढवणारी ठरेल, अशी मला खात्री आहे. मागच्या दोन वर्षांपूर्वी शहरात झालेल्या छत्रपती शिवराय केसरी कुस्ती स्पर्धेच्या परितोषिक वितरण समारंभास तत्कालीन उपमुख्यमंत्री व आत्ताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले असता त्यांच्याकडे या वाडियापार्क मैदानासाठी निधीची मागणी केली होती. त्यानुसार शासनाने ५० कोटींचा निधी मंजूर केला असून आणखीनही निधी देणार आहेत. भविष्यात नगरवासीयांना एक चांगले अद्यावत क्रीडा संकुल पुढील काळात उपलब्ध होणार आहे, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले.



अहिल्यानगर शहरात होणाऱ्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या मैदान, आखाड्यांची व तयारीची पाहणी करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे. समवेत स्पर्धेचे संयोजक आ.संग्राम जगताप, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधिक्षक राकेश ओला, आयुक्त यशवंत डांगे, डॉ.पै. संतोष भुजबळ, शिवाजी चव्हाण, अनिल गुंजाळ आदी.

२९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान अहिल्यानगर शहरात वाडियापार्क मैदानावरील स्व. बलभीमअण्णा जगताप क्रीडा नगरीत होणाऱ्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या मैदानास मंत्री राधाकृष्ण विखे यांनी भेट देऊन आखाड्यांची व तयारीच पाहणी केली. स्पर्धेचे संयोजक व जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आ.संग्राम जगताप यांनी मंत्री विखे यांचे स्वागत करून स्पर्धेची व मैदानांची माहिती दिली. यावेळी जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ यांनी मंत्री विखे यांचा सत्कार केला. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधिक्षक राकेश ओला, प्रांताधिकारी उमेश पाटील, जिल्हा क्रीडाधिकारी सोमेकर आमसिध्द, मनपा आयुक्त यशवंत डांगे, कुस्तीगीर संघाचे शिवाजी कराळे, युवराज करंजुले, अनिल गुंजाळ, सोमनाथ लोंढे, उमेश भागानागरे, माजी उपमहापौर गणेश भोसले, अविनाश घुले, ज्ञानदेव पांडूळे, अभिजित खोसे, प्रकाश भागानगरे, निखील वारे, बाळासाहेब पवार, संपत नलावडे, पै महेश लोंढे आदींसह पैलवान उपस्थित होते.

यावेळी मंत्री विखे यांनी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या उत्कृष्ट नियोजना बद्दल संयोजक आ.संग्राम जगताप यांचा व माजी उपमहापौर गणेश भोसले यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करून अभिनंदन केले.



नगरच्या अमिधा तिवारी या विद्यार्थिनीने दिल्लीच्या कर्तव्य पथावर संचलन केले.

# नगरची विद्यार्थिनी अमिधा तिवारी हिने दिल्ली येथील कर्तव्य पथावर केले संचलन

नगर – शहरातील भोसले आखाडा येथील रहिवासी अमिधा विकास तिवारी हिने प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथे झालेल्या परेड मध्ये कर्तव्य पथावर (राजपथ) उत्कृष्ट संचलन केले. सध्या बिर्ला बालिका विद्यापिठात ती शिक्षण घेत आहे.

अमिधा तिवारी हिने बिर्ला बालिका विद्यापीठ ६६ व्या आरडीसी दलाच्या ५१ कॅडेट्सचे नेतृत्व केले. ती गिराज किशोर तिवारी यांची ती नातू व विकास तिवारी यांची मुलगी आहे. कठीण प्रशिक्षण घेऊन तिने यशस्वीपणे उत्कृष्ट संचलन करण्याचे ध्येय साध्य केले आहे. १ जानेवारीपासून ती परेड शिबिराच्या तयारीसाठी सराव करत होती. ती सेंट मायकलची माजी विद्यार्थिनी असून, सध्या ती बिर्ला बालिका विद्यापिठात इयत्ता नववीमध्ये शिकत आहे.



कर्नल विवेक तिवारी यांनी याबद्दल तिला शुभेच्छा दिल्या.




विळदघाट येथे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व स्पेशल ऑलिंपिक्स भारत महाराष्ट्र तसेच जिल्हा समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद समग्र शिक्षा समावेशित शिक्षण विभाग अहिल्यानगर यांच्या वतीने जिल्हास्तरीय दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शालेय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. (छाया – लहू दळवी)

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांसाठी राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करणार

**धनश्री विखे पाटील यांचे प्रतिपादन**

नगर – दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कला गुणांसाठी व करिअरसाठी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र गेल्या तीन वर्षापासून काम करत आहे. दिव्यांग विद्यार्थी हा क्रीडा स्पर्धेमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्यासाठी प्रशिक्षणाची खरी गरज आहे, त्यासाठी सहकार्याची भूमिका घेतली असून म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळत नाही, तरी शिक्षक, पालक यांनी पुढाकार घेऊन दिव्यांग विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम आपण सर्वजण मिळून करू लवकरच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करणार असल्याचे प्रतिपादन स्पेशल ऑलिंपिक्स भारत महाराष्ट्र अध्यक्ष धनश्री विखे पाटील यांनी केले.

विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे जिल्हा दिव्यांक पुनर्वसन केंद्र व स्पेशल ऑलिंपिक्स भारत महाराष्ट्र तसेच जिल्हा समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद समग्र शिक्षा समावेशित शिक्षण विभाग अहिल्यानगर यांच्या वतीने जिल्हास्तरीय दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शालेय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे उद्घाटन धनश्री विखे पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे, पी एम गायकवाड, वसंत कापरे, डॉ. अभिजीत दिवटे, दीपक अनाप, डॉ. अभिजीत मिरीकर, विक्रांत येवले, सुनील कोल्हापुरे आदी उपस्थित होते

प्रवीण पोरगंटीवार म्हणाले, दिव्यांग विद्यार्थी हा स्पर्धेच्या माध्यमातून घडला जातो त्यासाठी व्यासपीठ निर्माण करून देणे गरजेचे आहे, विखे फाउंडेशनने प्रशासनाला काम करताना केलेल्या मदतीमुळे विद्यार्थी नक्कीच घडतील. आपल्या जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम विखे फाउंडेशनने केले आहे असे ते म्हणाले

दीपक अनाप म्हणाले, जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या २८ शाळा सहभागी झाल्या असून ४१० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला आहे. यामध्ये रनिंग, गोळाफेक, स्विमिंग आदींसह सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन केले आहे. अध्यक्षा धनश्री विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम केले जात असल्याचे ते म्हणाले.

यावेळी वसंत कापरे यांचे भाषण झाले. आभार देविदास कोकाटे यांनी मानले.

# सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेची विश्वासाहर्ता आणि उत्कृष्ट आर्थिक कारभाराची परंपरा कायम



संतोष गांधी

नगर – सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा यांनी स्थापन केलेल्या जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेत संचालक व मागील सुमारे दीड वर्षे काम करण्याची संधी मिळाली. सुवालाल गुंदेचा यांचा आदर्श समोर ठेवून सर्वांना सोबत घेऊन अतिशय शिस्तबद्ध व सभासद, ग्राहकांच्या हिताचा कारभार करण्यात यश मिळाले. नवनवीन उपक्रम राबवून प्रत्येक सभासदाचे संस्थेशी असलेले ऋणानुबंध अधिक घट्ट करण्याचा प्रयत्न केला. विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या सभासदांचा पतसंस्थेच्या वतीने सत्कार करण्याचा पायंडा पाडला. सहकार खात्याच्या नियमानुसार एनपीए मध्ये गेलेल्या अनेक खात्यांची कर्ज वसुली करून आर्थिक शिस्तीचा मापदंड निर्माण केला, अशा भावना पतसंस्थेचे चेअरमन संतोष गांधी यांनी व्यक्त केल्या.

कामकाजाबाबत बोलताना संतोष गांधी म्हणाले की, कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना एक सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत जिल्ह्यात उत्तम कारभारासाठी नावाजलेल्या पतसंस्थेत चेअरमन–पदाची संधी मिळाली. सर्व सहकारी संचालकांनी निवडणुकीनंतर लगेचच विश्वास दर्शवला. नव्या वास्तूत पहिला चेअरमन होण्याची संधी मिळाली. पहिल्या दिवसापासून एका ध्येयाने कामकाज सुरू केले. सर्वांशी विचार विनिमय करून चांगले निर्णय घेतले. जागतिक महिला दिनानिमित्त महिला सभासदांचा सन्मान व आरोग्य विषयक तज्ज्ञांचे व्याख्यान, नवरात्रात महिलांना ठेवीवर अतिरिक्त व्याजदर, अभिनव अशी सोने खरेदीसाठी कर्ज योजना सुरू केली. या योजनेला प्रतिसाद मिळाला. ज्येष्ठांना ठेवीवर अतिरिक्त व्याज दर दिला. मार्केट यार्ड शाखेचे आधुनिकीकरण करून संस्थेच्या इतिहासात प्रथमच मार्केट यार्ड येथे वर्धापनदिन साजरा केला. परिसरातील व्यापारी, खातेदारांशी संवाद साधत त्यांच्या अपेक्षा, मते जाणून घेतली. १५ टक्के लाभांशाची परंपरा कायम राखण्यातही यश आले.

संस्था सभासदांसाठी एक मोठे कुटुंबच आहे या भावनेतून जैन परंपरेनुसार जप तप उपवास करणाऱ्या सभासदांच्या सत्काराची प्रथा सुरू केली. स्वातंत्र्यसैनिक कुटुंबातील सभासदांचा देशाच्या स्वातंत्र्य दिनी आवर्जून सन्मान करण्यात आला. गणेशोत्सवात जास्तीत जास्त सभासद, विविध क्षेत्रातील मान्यवरांना संस्थेत बोलावून आरतीचा मान दिला. अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या उद्घाटनाचा देशाच्या इतिहासातील ऐतिहासिक क्षण संस्थेने साजरा केला. नगर शहरात दरवर्षी भगवान महावीर जयंतीला मिरवणूक निघते. या मिरवणुकीचे पतसंस्थेच्या वतीने स्वागत करून भाविकांना उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी टोपी वाटप केले.

पतसंस्थेची नेत्रदीपक प्रगतीची घोडदौड कायम राखण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. अर्थात या काळात काही आव्हांनाचाही सामना करावा लागला. काही चुकीच्या प्रवृत्तींनी विविध माध्यमांतून संस्थेबाबत गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु या काळातही धैर्याने काम करत सभासद, ठेवीदार, ग्राहक, हितचिंतकांचा विश्वास कायम राखण्यात यश मिळवले. विश्वासार्हता हे संस्थेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. ती टिकवून ठेवण्यासाठी सर्व सहकारी संचालक, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने यश मिळवले याचा मनस्वी आनंद व समाधान आहे. पतसंस्थेसाठी बचत प्रतिनिधी कणा असतात. त्यांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यात यश मिळाले.

माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला सहकारी बँकिंग मध्ये विश्वस्त भावनेने काम करताना सहकारमहर्षी सुवालाल गुंदेचा यांचा सहवास व प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळाले. याशिवाय जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सी.ए.अशोक पितळे, राजेंद्र चोपडा, राजेंद्र गांधी, सुभाष मुथा, सी.ए. रमेश फिरोदिया, अशोक (बाबूशेठ) बोरा, शैलेश मुनोत, बँकिंग तज्ज्ञ रमेश पितळे यांच्यासह सर्व आजी माजी संचालक, कायदेशीर सल्लागार, सर्व स्टाफचे वेळोवेळी सहकार्य लाभले.

मोठ्या विश्वासाने मिळालेल्या पदाला चांगला न्याय देता आले याचे समाधान आहे. या कामी साथ देणाऱ्या सर्वांचा मी कायम ऋणी राहील. भविष्यातही संस्थेच्या प्रगतीसाठी आवश्यक ते सर्व योगदान देण्यास मी कटिबद्ध असेल.

# भारत बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड लंडनच्या मान्यतेने १ तास २५ मिनिट २५ सेकंद वीना थांबणे (नॉन स्टॉप) स्केटिंग रेकॉर्ड

नगर – टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमी आयोजित भारत बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड लंडन यांच्या मान्यतेने १ तास २५ मिनिट २५ सेकंद वीना थांबणे (नॉन स्टॉप) स्केटिंग रेकॉर्ड चे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क येथे २५ जानेवारी रोजी सायंकाळी ५:३० वाजता माजी उपमहापौर गणेश भोसले यांच्या प्रमुख उपसथितीत व क्रीडा अधिकारी वीर भाऊराव व विशाल गर्जे यांच्या प्रमुख उपस्थित कार्यक्रमाचे उद्घाटन पार पडले.



टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमी आयोजित भारत बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड लंडन यांच्या मान्यतेने स्केटिंग रेकॉर्डचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क करण्यात आले होते यात सहभागी झालेले खेळाडू.

सदर कार्यक्रमासाठी खेळाडू वरद संदीप पेद्रम, जय सागर भंडारी, अरूष श्रेयस चेंगेडे, शिव सिध्दार्थ दळवी, तनिष्का मयूर दळवी, श्रीशा मयूर दळवी, ओजस अभिजीत शिंदे, कार्तिक संजय नन्नवरे, वियान निखिल मुथा, क्षितिज आकाश बोरा, ईश्वरी संदीप आव्हाड, साद काजिम शेख, आदर्श बिस्वजित बिस्वास, वैभव प्रदीप पाटोळे, मोहित दीपक बकाले, इंद्रनील संग्राम दळवी, देव मनोज वरमा, शिवांश गजेंद्र राठोड, देवांश गजेंद्र राठोड या खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

प्रारंभी आयोजन समितीचे अधक्ष प्रशांत पाटोळे यांनी केले. यावेळी संघेटनेचे श्रीकांत कसाब सर, पियूष कदम, अक्षय चौधरी, विशाल साळवे, प्रवीण गायकवाड, असिफ शेख सर महेश आनंदकर यांनी काम पाहिले, सूत्रसंचालन प्रदीप पाटोळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी खेळाडूंना पदक देवून गौरिण्यात आले.

# जिल्हा निवडणूक शाखेच्यावतीने नाना डोंगरे यांचा सन्मान

नगर – लोकसभा, विधानसभा निवडणूकीत मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबवून दिलेल्या योगदानाबद्दल निमगाव वाघा (ता. नगर) येथील पै. नाना डोंगरे यांचा जिल्हाधिकारी कार्यालयात सन्मान करण्यात आला. जिल्हा निवडणूक शाखेच्या वतीने १५ व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त मतदार जागृती करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ व जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या हस्ते डोंगरे यांना प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.



लोकसभा, विधानसभा निवडणूकीत मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबवून दिलेल्या योगदानाबद्दल निमगाव वाघा (ता. नगर) येथील पै. नाना डोंगरे यांचा जिल्हाधिकारी कार्यालयात सन्मान करताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ व जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला आदी.

यावेळी मनपा आयुक्त यशवंत डांगे, उपजिल्हाधिकारी (निवडणुक शाखा) राहुल पाटील, प्रांत अधिकारी सुधीर पाटील, शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे आदी जिल्हा प्रशासनातील अधिकारी वर्ग उपस्थित होते.



स्टेअर्स फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेत स्टेअर्स अहिल्यानगर फुटबॉल संघाने विजेतेपद पटकाविले.

# राज्यस्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेत स्टेअर्स अहिल्यानगर फुटबॉल संघाला विजेतेपद

**१४ व १७ वर्ष गटातील मुलांच्या संघाची दिल्ली येथील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड**

नगर – स्टेअर्स फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेत स्टेअर्स अहिल्यानगर फुटबॉल संघाने विजेतेपद पटकाविले. १४ वर्षे मुले व १७ वर्षे मुलांनी या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. या विजयी संघाची दिल्ली येथे राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अहिल्यानगर फुटबॉल संघातील १४ वर्षे मुले व १७ वर्षे मुले या वयोगटात दुहेरी मुकुट साखळी सामन्यात १४ वर्षातील मुलांनी बीड, पुणे, रायगड, गोंदिया या संघावर विजय मिळवून अंतिम सामन्यात जालना जिल्ह्याच्या संघाला २–० ने पराभव करून विजय मिळविला. तसेच १७ वर्षे वयोगटातील मुलांनी साखळी सामन्यात रायगड, गोंदिया, सातारा, बीड जिल्ह्यांना पराभव करून अंतिम सामन्यात जालना विरुद्ध अहिल्यानगर स्टेअर्स फुटबॉल संघाने पराभव करून अंतिम सामना अहिल्या नगरच्या नावे केला.

या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू म्हणून भार्गव पिंपळे, शुभंकर सावंत, अमर शेख यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या राज्यस्तरीय स्पर्धेतून अहिल्यानगरचा संघ दिल्ली येथे राष्ट्रीय स्पर्धेकरिता महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. विजयी संघाचे व प्रशिक्षकांचे अहिल्यानगर स्टेअर्स फुटबॉल चे अध्यक्ष विजू कमलात (टायरवाले), उपाध्यक्ष डॉक्टर प्रताप पटारे, उपाध्यक्ष विन्सेंट फिलिप्स, नमोह फुटबॉल क्लबच्या संचालिका नमिता फिरोदिया, बेलेकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अभिजीत बेलेकर, उद्योजक आदेश भगत, सुभाष कनोजिया, मनीष राठोड, व सदस्य निलेश हराळे, वृषाली पटेकर, राहुल जोशी, अर्जुन खेकडे अभिनंदन केले. १४ वर्षे वयोगटातील खेळाडूंना प्रशिक्षक सौरभ चव्हाण, रितिक चव्हाण व १७ वर्ष वयोगटातील खेळाडूंना प्रसाद पाटोळे, मयूर टेमक यांचे मार्गदर्शन लाभले.

# छत्रपती शिवाजी महाराजांची शौर्यगाथा गड-किल्ल्यांवर लोककलांचा माध्यमातून सादर करण्याचा प्रयत्न करू

**उद्योगमंत्री उदय सामंत यांचे प्रतिपादन; १०० व्या अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्यसंमेलनाचे उद्घाटन, नाट्यदिंडी ठरली विशेष आकर्षण**

नगर – महाराष्ट्राची लोककला सर्वदूर पोहोचवण्यासाठी राज्यातील गड–किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराजांची शौर्यगाथा लोककलांचा माध्यमातून सादर करण्याबाबत लवकरच प्रयत्न करण्यात येईल, असे उद्योगमंत्री तथा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे विश्वस्त उदय सामंत म्हणाले. अहिल्यानगर येथील १०० व्या अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्यसंमेलनाचे स्व.सदाशिव अमरापूरकर नाट्यनगरी येथे उदय सामंत यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.



१०० व्या अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्यसंमेलनाचे उद्घाटन प्रसंगी उद्योगमंत्री उदय सामंत.

या कार्यक्रमाला आमदार संग्राम जगताप, विश्वस्त व ज्येष्ठ सिनेनाट्य अभिनेते मोहन जोशी, अभिनेते मकरंद अनासपुरे, ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, स्वागताध्यक्ष डॉ. बापूसाहेब कांडेकर, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, प्रा. शिरीष मोडक, नाट्यपरिषदेच्या मध्यवर्तीचे प्रमुख कार्यवाह अजित भुरे, दिलीप कोरके, दीपा क्षीरसागर, सतीश लोटके, अहिल्यानगर उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रा. प्रसाद बेडेकर, प्रमुख कार्यवाह चैत्राली जावळे, अमोल खोले यांच्यासह परिषदेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

नाट्यसंमेलन ऐतिहासिक असून नवे कलाकार घडविण्याचे कार्य अहिल्यानगर नाट्य परिषद शाखेने नेहमी केल्याचे नमूद करून श्री. सामंत म्हणाले, हौशी आणि प्रायोगिक रंगभूमी पासून व्यावसायिक रंगभूमीकडे जाणारे कलाकार घडविण्याची गरज आहे. राज्यात लोककला, संगीत क्षेत्राच्या विकासात ज्येष्ठ कलाकारांचे मोठे योगदान आहे. शहरात नाट्यगृहाची सुविधा करतांना व्यावसायिक नाटकांवर होणारा खर्च कमी करणे गरजेचे आहे. त्यासाठी नाट्यगृहांमध्ये सौर ऊर्जेचा वापर होणे गरजेचे आहे. स्थानिक हौशी रंगभूमी कलाकारांना कमी दराने नाट्यगृह उपलब्ध करून द्यावे, अशी सूचना त्यांनी केली. मराठी भाषेच्या विकासासाठी चांगल्या सूचना आल्यास त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच अहिल्यानगर परिसरात ३ हजार ५०० कोटींचे प्रकल्प उभे राहणार असून त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. दावोस येथे देखील जिल्ह्यात उद्योग आणण्यासाठी करार करण्यात आल्याची माहिती, श्री.सामंत यांनी दिली.

ज्येष्ठ रंगकर्मी मोहन जोशी यांनी विभागीय नाट्य–संमेलन सुनियोजित असल्याचे नमूद करून अहिल्यानगर उपनगर शाखेचे आयोजनाबद्दल अभिनंदन केले.

अभिनेते मकरंद अनासपुरे म्हणाले, नवोन्मेष आणि नवी ऊर्जा असलेल्या रंगकर्मींसाठी ठोस कामगिरी होईल. हौशी रंगमंच सशक्त झाल्यास व्यावसायिक रंगभूमीला बळ मिळते. प्रायोगिक रंगभूमीसाठी गावोगावी मंच उभे राहिल्यास व्यावसायिक रंगभूमी सशक्त होते. राज्य पातळीवर यशस्वी एकांकिका ठिकठिकाणी दाखविण्यात याव्यात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड–किल्ल्यांवर लोककलाकारांच्या माध्यमातून शौर्याची गाथा मांडली गेल्यास नव्या पिढीला प्रेरणा मिळेल. रंगकर्मी जेवढे मोठे होतील तेवढा समाजातील एकोपा टिकून राहील, असेही त्यांनी सांगितले.

स्वागताध्यखं डॉ. कांडेकर आणि प्रमुख कार्यवाह अजित भुरे यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले.

विभागीय नाट्यसंमेलन प्रमुख क्षितिज झावरे यांनी प्रास्ताविकात विभागीय नाट्यसंमेलन विषयी माहिती दिली. अध्यक्ष प्रसाद बेडेकर यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन मधुरा झावरे व अभिजित क्षीरसागर यांनी केले व आभार प्रदर्शन प्रमुख कार्यवाह चैत्राली जावळे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अहिल्यानगरच्या १०० कलाकारांनी नांदी आणि १०० कलाकारांनी स्वागत नृत्य सादर केले. विभागीय नाट्य संमेलनाची सुरुवात नाट्यदिंडीने करण्यात आली. प्रोफेसर कॉलनी चौकापासून संमेलन स्थळापर्यंत नटराजाच्या दिंडीचे आयोजन करण्यात आले. या दिंडीमध्ये अभिनेते मोहन जोशी, कमलाकर सातपुते, प्रेमानंद गज्वी, अभिनेत्री माधवी निमकर यांच्यासह अनेक लोककलावंत व स्थानिक कलाकार सहभागी झाले होते. उद्घाटनानंतर संगीत रजनी हा कार्यक्रम सादर झाला.

# अहिल्यानगर शहरात २८ जानेवारीला दिव्य अखंड ज्योतीची यात्रा मिरवणूक

नगर – शताब्दी वर्ष महोत्सवा निमित्त गायत्री साधना केंद्राचेवतीने २८ जानेवारी रोजी दिव्य अखंड ज्योतीची यात्रा मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.



मिरवणुक मार्ग अहिल्यानगर माळीवाडा वेस, विशाल गणपती मंदीरापासुन ते पंचपीर चावडी, आशा टॉकीज चौक, माणिक चौक, कापडबाजार, तेलीखुंट, नेता सुभाष चौक, चितळे रोड, लक्ष्मी कारंजा, गायत्री मंदिर महाजन गल्ली येथे समारोप होणार आहे.

ज्योती कलश यात्रेचे आयोजन केले आहे व या यात्रेत भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन गायत्री परीवार नगर शाखेचे हरीभाऊ डोळसे, काशीनाथ मोडे यांनी केले आहे.

# गणेश जयंतीनिमित्त श्री एकदंत गणेश मंडळाच्या ७९ युवकांचे रक्तदान

नगर – सालाबादप्रमाणे यावर्षीही श्री एकदंत गणेश मंडळाच्यावतीने एकदंत कॉलनी, दातरंगे मळा, अहिल्यानगर येथे गणेश जयंतीनिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक, समाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या गणेश जयंती उत्सवाचा शुभारंभ इंजि.सतिष पागा, आर.जे.प्रसन्न, बालाजी गोणे, रघुनाथ गाजेंगी, मल्लिकार्जुन इराबत्तीन यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आले. यामध्ये ७९ युवकांनी रक्तदान केले. या शिबीरात दातरंगे मळा परिसरातील नागरीकांसह नगर शहर परिसरातील युवकांनी सहभाग घेतला. यावेळी १५० महिलांची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली. या शिबीराला आनंदऋषीजी ब्लड बँकेचे सुनिल महानोर, सरिता मोरे, निशांत शेख, सुशिल सावळे, किरण रणदिवे व सहकारी स्टाप यांचे सहकार्य लाभले.



एकदंत कॉलनी, दातरंगे मळा येथे गणेश जयंतीनिमित्ताने श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी इंजि.सतिष पागा म्हणाले कि, एकदंत कॉलनीतील बहुसंख्य समाज हा पद्मशाली समाज असून हा समाज अतिशय प्रामाणिक, कष्टकरी, होतकरु व मेहनती आहे. अतिशय गरिबीतून काम, शिक्षण पूर्ण करुन आज या समाजाची चौथी पिढी सामाजिक क्षेत्रात ही कार्यरत आहे. आज गणेश जयंती निमित्ताने धार्मिक कार्यक्रमाबरोबरच सामाजिक काम मंडळाच्या वतीने राबवुन समाजात अतिशय चिकाटीच काम करत आहेत. आज रक्ताचा तुटवडा पडला आहे, मंडळाच्यावतीने आज हे शिबीर घेवुन चांगली सेवा घडवुन आणली असून त्या माध्यमातून कित्येक जणांचे प्राण वाचविण्याचे काम मंडळाकडून होत आहे, हि कौतुकास्पद बाब आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी आर.जे. प्रसन्न कि, २१ वर्षापासून मंडळाने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करुन मंडळाने नगर शहरात नाव कमवले आहे. त्यांच्या या कार्याला शुभेच्छा. रक्त कुठे ही तयार होत नाही, माणसालाच रक्तदान करावे लागते. त्यामुळे आपल्या कडून होईल तितक्या प्रमाणात रक्तदान शिबीर भरवावे, जेणे करुन येणाऱ्या संकटाला सामोरे जाताना रक्तदानाची अडचण निर्णाम होणार नाही, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कार्यकर्ते व एकदंत महिला मंडळाने परिश्रम घेतले. सुत्रसंचालन रोशन सुंकी यांनी केले. आभार किर्ती इराबत्तीन यांनी मानले.

# अर्थजगत

## कमोडिटी व्यवहारांच्या अंतरंगात..

■ प्रदीप गुडसुरकर, शेअर बाजार अभ्यासक

कोणत्याही उद्योग-व्यवसायातून नफा मिळवण्याची अपेक्षा स्वाभाविक असते. यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करीत असतो. परंतु शेअर बाजारामध्ये अंदाज व कृती यामध्ये बरेचसे अंतर आहे, हे अनुभवी ट्रेडरला लक्षात येते. सध्याच्या काळामध्ये नवीन तरुणाई शेअर बाजारात गुंतवणूक , शेअर ट्रेडिंग, डेरिव्हेटिव्ह, कमोडिटी अशा विविध क्षेत्रांमध्ये अर्थव्यवहार करत आहे. परंतु यातील बहुतांश तरुणाईच्या डोक्यामध्ये एका रात्रीतनं श्रीमंत होण्याची मनीषा असते. त्यांच्याकडे नियोजन नसल्यामुळे कुठे थांबायचे हे समजत नाही. शेअर बाजारातील जोखीम आणि परतावा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यातील संकल्पनांसंदर्भामध्ये अर्धवट किंवा अपुरी माहिती असल्याने आयुष्याची पुंजी, परिश्रमाने कमावलेले पैसे एका झटक्यात दुसऱ्याला दान दिल्यासारखे जाण्याचा धोका असतो. हा धोका लक्षात न घेता शेअर बाजारातील व्यवहार केल्यामुळे तेलही गेले अन तूपही गेले अशी स्थिती उद्भवते. त्यातून समाजामध्ये त्यांच्याप्रती व बाजाराप्रती एक वेगळा संदेश जात असतो. शेअर बाजार म्हणजे जुगार आहे, येथे कमाई कमी आणि गमाई जास्त आहे, अशी चुकीची धारणा समाजात निर्माण होते. परिणामी, शेअर बाजाराविषयीची अनामिक भीतीचे वातावरण तयार होते.



● वेध बाजाराचा

वस्तुतः शेअर बाजारात वेगवेगळे दालाने आहेत. शेअर गुंतवणूक, शेअर ट्रेडिंग, ऑप्शन ट्रेडिंग, फॉरवर्ड ट्रेडिंग अशा अनेक क्षेत्राची परिपूर्ण माहिती असणारा व्यक्ती प्रचंड नफा कमवतो. तो नफा व जोखीमेची योग्य पद्धतीने व्यवस्थापन करीत असतो. तशा प्रकारचा सराव गृहपाठाद्वारे करत असतो.

वास्तविक पाहता बाजारात पूर्वीपासून व्यवहार केला जातो. पैसा हे विनमय साधन जेव्हा वापरले जाते, त्यापूर्वीपासून बाजारात देवघवीचा व्यवहार अस्तित्वात होता. त्यावेळी वेगवेगळ्या पद्धतीने व्यवहार होत असे. उदाहरणार्थ, पशुधनाच्या मोबदल्यामध्ये शेतमाल खरेदी करणे अशा प्रकारचे व्यवहार होत असत. याला वस्तुविनिमय म्हटले जात असे. आजचे कमोडिटीचे व्यवहार जसे होतात तशी स्थिती नव्हती. परंतु कालोघात यात बदल होत गेला आणि आज आपण शेअर बाजारामध्ये कमोडिटीचे व्यवहार व डेरिव्हेटिव्हचे व्यवहार पहात आहोत. कमोडिटीचा पहिला व्यवहार हा जपानमध्ये ओसाका राईस एक्सचेंज हा १७३० रोजी स्थापन झाला. तो संघटित स्वरूपाचा कमोडिटी व्यवहार होता. १७ व्या शतकामध्ये मोठ्या प्रमाणावर अशा प्रकारचे व्यवहार व्हायचे. जपानच्या अर्थव्यवस्थेमध्ये राईसचे खूप महत्व होते. ॲग्रीकल्चर कमोडिटीमध्ये त्याचे महत्त्व वाढत गेले. सर्व भागांमधून मिळणारा तांदुळ ओसाकाकडे पाठवले जात आणि तिथे साठवले जात असत. हा तांदुळाचा साठा लिलावाद्वारे विकला जात असे. त्यानंतर विक्रेता त्यांना सर्टिफिकेट देत असे. हे सर्टिफिकेट एक्स्चेंजवर दाखविल्यानंतर पैसे दिले जात असत. त्याला राईस बिल असे संबोधले जायचे.

पुढील काळात अशाच प्रकारचे एक्सचेंज विविध राष्ट्रांमध्ये सुरू झाले. अमेरिकेत शिकागो बोर्ड ऑफ ट्रेडिंग स्थापन झाले. लंडनमध्ये मेटल एक्सचेंजची सुरुवात झाली. हा कालावधी १८४८ ते १८७७ दरम्यान होता. या एक्सचेंजमुळे पुढे अर्जेंटिना, चीन, इजिप्त, हंगेरी तुर्की, रशिया आणि भारत अशा देशांमध्येही कमोडिटीसदृश्य व्यवहार होऊ लागला. भारताचा विचार करता, पूर्वीच्या काळी फॉरवर्ड ट्रेडिंग हे प्राणी व शेती, धातू इत्यादी स्वरूपामध्ये सुरू झाल्याची नोंद कौटिल्य अर्थशास्त्रामध्ये दिसून येते. त्या काळामध्ये असा व्यवहार करीत असताना तेजी, मंदी, गली, अटक इत्यादी शब्दांचा सर्रास वापर होत असे.

भारतात १८७५ नंतर खऱ्या अर्थाने कमोडिटी डेरिव्हेटिव्हजची सुरुवात झाली. बॉम्बे कॉटन ट्रेड असोसिएशन लिमिटेड याद्वारे ते अस्तित्वात आले. त्यानंतर गुजराती व्यापारी मंडळींनी एकत्र येऊन क्लस्टर सीड ग्राउंड करून अशा स्वरूपाचा व्यवहार सुरू केला. १९१९ नंतर कोलकात्याला त्याची सुरुवात झाली. पुढे अमृतसर, भटिंडा राजकोट जयपूर दिल्ली इत्यादी ठिकाणी असे व्यवहार मोठ्या प्रमाणावर वाढत गेले.

पूर्वीच्या काळी असे व्यवहार सट्टासदृश व्हायचे. वास्तविक, अशा व्यवहारात भविष्यामध्ये आपत्ती, रोगराई, युद्ध अशा स्वरुपाच्या घटना कमोडिटी व्यवहारावर थेट परिणाम करणाऱ्या असल्याने याचा फटका व्यापारी वर्गाला बसायचा. १९१९ नंतर तत्कालीन सरकारने बॉम्बे कॉन्ट्रॅक्ट कंट्रोल ॲक्ट स्थापन करून कॉटन कॉन्ट्रॅक्ट बोर्ड स्थापन केले. हा बोर्ड सट्टा बाजारावर काही प्रमाणामध्ये नियंत्रण ठेवण्याचे काम करत असे. यानंतर १९३९ नंतर होणारे ऑप्शन ट्रेडिंगच्या व्यवहारावरती बंदी अथवा दूर निर्बंध घालून कालांतराने बॉम्बे ऑप्शन इं कॉटन प्रोहिबिशन ॲक्ट १९३९ला आला. डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टनुसार फॉरवर्ड ट्रेडिंगसाठी मनाई करण्यात आलेली होती. यामध्ये मसाले, खाद्यतेल, साखर, कापड इत्यादी वस्तूंचा समावेश करण्यात आला.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्टॉक एक्सचेंज अँड फ्युचर मार्केटचा समावेश केंद्रीय सूचीमध्ये करण्यात आला. त्यासंदर्भातील जबाबदारी व नियम केले होते. नंतरच्या कालावधीत संसदेमध्ये फॉरवर्ड कॉन्ट्रॅक्ट रेगुलेशन १९५२ स्थापन करण्यात आला आणि तो संपूर्ण भारतात लागू करण्यात आला. त्याची जागा पुढे सेक्युरिटी अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ज्याला आपण सेबी म्हणतो त्याअंतर्गत सेक्युरिटी कॉन्ट्रॅक्ट रेगुलेशन ॲक्ट १९५६ ला करण्यात आला. कमोडिटी ट्रेडिंगमध्ये प्रगत समाजाच्या प्रवाहात बऱ्याच सुधारणा करण्यात आल्या. आता त्याची जागा इलेक्ट्रॉनिक ट्रेडिंग प्लॅटफॉर्मने घेतली आहे. खरेदीदार आणि विक्रेता असा व्यवहार करीत असतात. जोखमीचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन त्यात केले जाते. ◆◆◆

## अर्थसंकल्पात सुधारणावर भर हवा

केंद्र सरकारकडे पुरेसे बहुमत आहे. या राजकीय भांडवलाचा वापर केंद्र सरकारने अर्थसंकल्पात महत्त्वाच्या सुधारणा करण्यासाठी करावा अशी सूचना रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर डी सुब्बाराव यांनी केली आहे. सरकारकडे बहुमत नसल्यानंतर सुधारणा करणे शक्य नसते. मात्र सुदैवाने मोदी सरकारकडे पुरेसे बहुमत आहे आणि सरकार स्थिर आहे. अशा परिस्थितीत सरकार जनतेला न आवडणारे निर्णय अर्थसंकल्पात घेऊ शकते. त्याचबरोबर नव्या सरकारचा हा पहिला अर्थसंकल्प आहे आणि निवडणुका चार वर्षानंतर आहेत. त्यामुळे सरकार लोकप्रिय नसलेल्या धाडसी सुधारणा या अर्थसंकल्पात करू शकेल असे त्यांनी सांगितले. कामगार सुधारणा, कृषी क्षेत्रातील सुधारणा इत्यादी सुधारणा राजकीय अस्थैर्यामुळे या अगोदर मागे पडल्या आहेत. या सुधारणा केल्यानंतर रोजगार निर्मिती वाढून विकासदर दीर्घ पल्ल्यात वाढण्यास मदत होऊ शकेल असे त्यांनी सांगितले.




१९९१ मध्ये पी व्ही नरसिंहराव सरकारकडे पुरेसे बहुमत नसतानाही आवश्यकता म्हणून त्या सरकारने मोठ्या आर्थिक सुधारणा जाहीर केल्या. त्यानंतर भारताचा चेहरा माहेरा बदलला होता. मात्र पुढे विविध सरकारनी आपले अस्तित्व टिकवण्यासाठी अशा प्रकारच्या सुधारणाकडे दुर्लक्ष केलेले आहे. मोदी सरकारने चांगले बहुमत मिळाल्यानंतर २०१४ पासून बऱ्याच सुधारणा केल्या आहेत. मात्र अजून काही सुधारणा शिल्लक आहेत. या सुधारणा करण्यासाठी ही चांगली संधी आहे असे त्यांनी सूचित केले. तळातील ५०% लोकांकडून होत असलेली खरेदी वाढविण्याची गरज आहे. यासाठी त्यांचे उत्पन्न वाढवावे लागेल. यासाठी लघुउद्योग आणि कृषी क्षेत्रात सुधारणा करणे आवश्यक आहे. यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकेल आणि सर्वसमावेशक विकासाला चालना मिळू शकेल असे त्यांनी सांगितले. अमेरिका चीनकडे दुर्लक्ष करत आहे. अशा परिस्थितीत परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी भारत सरकारने रचनात्मक काम करण्याची सूचना त्यांनी केली. ◆◆◆

## क्युआर कोडने पैसे पाठवताना...

जगात आजकाल प्रत्येक गोष्ट डिजिटल होत आहे. या डिजिटल युगात पैशाचे व्यवहार देखील ऑनलाइनने झटपट हात आहे. यापुढे जात क्युआर कोडने पैसे ट्रान्सफर करण्याची सुविधा उपलब्ध झाली असून ती अतिशय सुलभ आणि सोपी आहे. काडीपेटी खरेदीपासून ते महागडा मोबाईल खरेदी करण्यापर्यंतचे व्यवहार क्युआर कोडने होत आहेत. मात्र पैसे पाठविण्याच्या घाईगडबडीत अनेकदा तुम्ही आम्ही बनावट स्कॅमर्सच्या बनावट क्युआर कोडला बळी पडू शकता. अलिकडेच बनावट क्युआर कोड स्कॅनचे अनेक प्रकरणे उघडकीस आले आहेत. पडताळणी न करता क्युआर कोड स्कॅन करणे हे जोखमीचे राहू शकते. एकीकडे क्युआर कोडला स्कॅमर्सनी बनावट कोडच्या साह्याने बदल केलेला असल्याने पेमेंट थेट स्कॅमर्सच्या खात्यात जात आहेत. अशावेळी बनावट आणि खरे क्युआर कोड ओळखणे महत्त्वाचे ठरते. सर्वच क्युआर कोड एकसारखे दिसतात. परंतु त्यापासून बचाव करण्यासाठी काही गोष्टींची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

■ सूर्यकांत पाठक, उपाध्यक्ष, राष्ट्रीय ग्राहक पंचायत

**साउंड बॉक्सचा वापर**

बनावट क्युआर कोडपासून वाचण्यासाठी पेमेंट रिसीव्हर आणि पेमेंट करणाऱ्या दोघांनी सजग राहणे आवश्यक आहे. रिसीव्हरने पेमेंटची खातरजमा करण्यासाठी साऊंड बॉक्सचा वापर करायला हवा. अशावेळी बनावट क्युआर कोडच्या माध्यमातून पेमेंट होत असेल तर त्याला वेळीच थांबवता येऊ शकते.

**पेमेंट करण्यापूर्वी खातरजमा**

तुम्ही क्युआर कोडद्वारे पेमेंट करत असाल तर पेमेंटच्या अगोदर दुकानदार किंवा मालकाचे नाव विचारून घ्या आणि कोड स्कॅन केल्यावर तुमच्या मोबाईलवर तेच नाव आहे का ते पाहा. स्कॅन केल्यानंतर भलत्याच व्यक्तीचे नाव समोर येत असेल तर पेमेंट करू नका आणि तशी सूचना मालकाला द्या. यानुसार तो क्युआर कोडबाबत कारवाई करू शकेल.

**चुकीच्या क्युआर कोडची ओळख**

एखादे पेमेंट करताना क्युआर कोड संशयित वाटत असेल तर गुगल लेन्सच्या मदतीने क्युआर कोड स्कॅन करायला हवा. या प्रयोगातून तुम्हाला युआरएल हे कोणत्या संकेतस्थळावर रीडायरेक्ट होत आहे हे समजेल आणि फसवणुकीतून तुमचा बचाव होऊ शकतो. एक फेक किंवा संशयास्पद यूआरएल हा टायपो किंवा चुकीच्या शब्दांत असतो. तसेच एक्स्टरनल टुलचा वापर करत लहान केलेल्या क्युआर कोडच्या युआरएलचा वापर करू नये. छोटा यूआरएल हा युजरला कोणत्याही संकेतस्थळाचे नाव दाखवत नाही. त्याचबरोबर तुम्हाला एखाद्याकडून पैसे घ्यायचे असेल तर क्युआर कोड स्कॅन करण्याची गरज नाही.




**क्युआर कोडने ॲप डाउनलोड करू नये**

तुम्ही क्युआर कोडच्या मदतीने ॲप डाउनलोड करत असाल तर सावधान. कारण कदाचित फसवे ॲप डाउनलोड होऊ शकते आणि आपल्या स्मार्टफोनच्या माध्यमातून गोपनीय माहिती चोरी होण्याची शक्यता राहाते. ॲप कोणताही असो तो गुगल प्ले स्टोअर किंवा ॲपल ॲप स्टोरवरूनच डाउनलोड करायला हवा. ॲपसाठी क्युआर कोड स्कॅनिंग टाळावे.

**फेरफार केलेल्या क्युआर कोडपासून सावध**

फिजिकली क्युआर कोड स्कॅन करण्यापूर्वी कोड व्यवस्थित आहे की नाही याची खातरजमा करायला हवी. म्हणजेच खऱ्या कोडवर कोणी स्टिकर तर लावलेले नाही ना? ते पाहा. तुम्हाला संशय वाटत असेल तर संबंधित व्यक्तीकडून क्युआर कोडची तपासणी करून घ्या किंवा अशा कोडच्या वापरापासून दूर राहा.

संकेतस्थळ सुरु करणाऱ्या कोडला स्कॅन करू नये संकेतस्थळ सुरु करणाऱ्या कोणत्याही क्युआर कोडला पेमेंटसाठी स्कॅन करू नका. तुम्हाला क्युआर कोडमार्फत पेमेंट करायचे असेल तर एक व्हॅलिड पेमेंट ॲपमार्फत करायला हवे. या व्यवस्थेत रिसिव्हरची खातरजमा झालेली असते. तुम्हाला एखाद्या संकेतस्थळाच्या मदतीने पेमेंट करण्याची गरज असेल तर स्वत: युआरएल टाइप करा.

**पैसे स्वीकारताना क्युआर कोड स्कॅन करणे**

पैसे पाठविण्यासाठी क्युआर कोडंचा वापर केला जातो आणि पैसे स्वीकारण्यासाठी देखील. पैसे किंवा पेमेंट ट्रान्सफर करण्याचा दावा करणारे मेसेज किंवा इमेल आले असतील आणि त्यात क्युआर कोड असेल तर ते स्कॅन करू नका. ◆◆◆

## 'एनपीएस'ने मिळवा ट्रिपल टॅक्स सवलत

**सध्याचे आर्थिक वर्ष संपण्यास अडीच महिने राहिले असून यानुसार करबचत योजनांत गुंतवणूक करण्यास फार काळ राहिलेला नाही. तुम्हाला अधिकाधिक कर वाचवायचा असेल तर योग्य कर बचत पर्यायाची निवड करत गुंतवणूक करायला हवी. कर बचतीच्या दृष्टीने नॅशनल पेन्शन सिस्टीममध्ये (एनपीएस) गुंतवणूक हा एक चांगला पर्याय आहे. सरकारी पेन्शन स्कीमच्या लाभासह आणखी एक मुद्दा म्हणजे जुन्या आणि नव्या कर रचनेत करसवलतीचा मिळणारा फायदा. या योजनेत इक्विटीचा देखील लाभ घेता येतो. त्यामुळे निवृत्तीनंतर चांगल्या परताव्याची अपेक्षा राहते.**




**जुन्या कर रचनेप्रमाणे करसवलत टीयर १ खात्यातील गुंतवणुकीवर करसवलत**

८० सीसीडी (१) नुसार सवलत : नोकरदार वर्गाना ८० सीसीडी (१) नुसार टियर १ खात्यात कमाल दीड लाखांचे योगदान किंवा वार्षिक वेतनाच्या कमाल दहा टक्के यापैकी जे कमी असेल त्यावर करसवलतीचा म्हणजे डिडक्शनचा लाभ मिळतो. त्याचवेळी नोकरदार नसलेल्या किंवा सेल्फ एम्प्लॉईड असलेल्या लोकांना टियर-१ मध्ये कमाल दीड लाखांचे योगदान देता येते आणि ग्रॉस टोटल इन्कमच्या कमाल वीस टक्के यापैकी जे कमी असेल त्यावर डिडक्शनचा बेनिफिट घेता येऊ शकते.

उदा. तुमचे वार्षिक वेतन वीस लाख असेल आणि दोन लाख तुम्ही एनपीएसमध्ये योगदान देत असाल तर त्यात तुम्हाला ८० सीसीसीडी(१) नुसार वार्षिक कमाल दीड लाखांपर्यंतच सवलत मिळेल, योगदानावर नाही. आणखी एक मुद्दा म्हणजे ८० सी (जीवन विमा, एनएससी, ज्येष्ठ नागरिक बचत योजना, सुकन्या समृद्धी, ट्यूशन फीस, गृहकर्जाच्या मूळ रक्कमेच्या भरणापोटीची रक्कम आदी) ८० सीसीसी (ॲन्युटी किंवा पेन्शन प्लॅन), ८० सीसीसीडी (१) असे एकुण कमाल दीड लाख रुपयांच्या वार्षिक गुंतवणुकीवर कर सवलत मिळवता येते.

■ **८० सीसीडी (१ बी) नुसार कर सवलत**

८० सीसीडी (१ बी) नुसार एनपीएस टियर-१ खात्यात दिलेल्या ५० हजारांच्या योगदानावर या कलमानुसार अतिरिक्त सवलत मिळते. यानुसार तुम्हाला एका आर्थिक वर्षात एनपीएसमध्ये कमाल दोन लाखांची सवलत मिळते. तुम्ही ८० सी, ८० सीसीसी नुसार एकूण दीड लाखांची गुंतवणूक केलेली असेल तरीही तुम्ही ८० सीसीसीडी (१ बी) नुसार एनपीएसमधील ५० हजाराची गुंतवणूक करत वेगळी कर सवलत मिळवू शकता.

■ **८० सीसीडी(२) मधील कर सवलत**

८० सीसीडी (२) नुसार कंपनीकडून कर्मचाऱ्यांना एनपीएसमध्ये दिलेल्या योगदानावरही करसवलत मिळते. मात्र खासगी कर्मचाऱ्यांना मुळ वेतनाच्या दहा टक्के योगदान आणि सरकारी कर्मचाऱ्यांना मात्र बेसिक सॅलरी+डीएच्या चौदा टक्के योगदानापर्यंच्या रक्कमेवरच कर सवलत मिळेल. ८० सीसीडी (२) नुसार डीडक्शनचा लाभ केवळ नोकरदारांना आहे.

■ **टीयर-२ मधील योगदानावर सवलत**

केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी टीयर-२ खात्यांत देखील कमाल दीड लाख रुपयांच्या गुंतवणुकीवर ८० सी नुसार कर सवलतीची तरतूद आहे. मात्र त्याचा लॉक इन पीरियड किमान तीन वर्षाचा राहिल. खासगी कर्मचाऱ्यांना टीयर-२ खात्यावर अशा प्रकारची सवलत मिळत नाही.

■ **नव्या कर व्यवस्थेतील कर सवलत**

नव्या कर व्यवस्थेत केवळ ८० सीसीडी (२) नुसार कर सवलतीची तरतूद आहे. म्हणजेच कंपनीकडून कर्मचाऱ्यांच्या एनपीएसमध्ये दिलेल्या योगदानापोटीच डिडक्शनचा लाभ मिळेल. मात्र हा लाभ कर्मचाऱ्यांना कंपनीकडून त्यांच्या मूळ वेतनाच्या चौदा टक्के योगदानापर्यंतच्या रक्कमेवरच मिळणार आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना देखील या कलमानुसार कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या बेसिक सॅलरी+डीए याच्या चौदा टक्के योगदानावरच डिडक्शनचा लाभ मिळेल. जुलै २०२४ च्या अर्थसंकल्पात बदल करण्यापूर्वी म्हणजेच आर्थिक वर्ष २०२३-२४ पर्यंत ८० सीसीडी(२०) नुसार न्यू टॅक्स रिझीमची निवड करणाऱ्या खासगी कर्मचाऱ्यांना कंपनीकडून बेसिक सॅलरीच्या दहा टक्के योगदानापर्यंतच्या रक्कमेवरच डीडक्शनचा लाभ मिळत होता. आर्थिक वर्ष २०२४-२५ पासून बदल केले आहेत.

■ **'एनपीएस'वर करबचत**

'एनपीएस'देखील पीपीएफप्रमाणेच करसवलतीच्या श्रेणीत आहे. तेथे जमा करण्यावर आणि काढण्यावर तसेच मिळणाऱ्या व्याजावर कोणताही कर आकारला जात नाही. खात्यातून कमाल ६० टक्के पैसे काढण्यावरही करसवलत आहे. 'एनपीएस'मध्ये जमा असलेल्या एकुण रक्कमेच्या ६० टक्के रक्कम काढण्याची मुभा आहे.अन्य ४० टक्के रक्कम ॲन्यूटी आणि पेन्शन प्लॅनमध्ये गुंतवावी लागते.

■ **ॲन्युटीवर कर**

अर्थात ॲन्युटीवर गुंतवणुकीची रक्कम ही करमुक्त असली तरी त्यावरचा मिळणारा परतावा किंवा पेन्शनवर करसवूलत नाही. याचाच अर्थ परतावा मिळणाऱ्या नियमित रक्कमेला वार्षिक उत्पन्नाशी जोडले जाते आणि करदात्याच्या कर श्रेणीप्रमाणे कर भरावा लागतो. ◆◆◆

## पीएफ ट्रान्स्फरचे टेन्शन कशाला?

■ जगदीश काळे




खासगी कंपनीत सेवारत असणारे कर्मचारी चांगल्या वेतनापोटी कंपनी बदलत असतात आणि गलेलठ्ठ पगार पदरात पाडून घेतात. अशावेळी भविष्य निर्वाह निधी खाते स्थानांतरित करण्याचे काम ताणाचे राहू शकते. पण या क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी चांगली बातमी आहे. नोकरी बदलणाऱ्या सदस्यांसाठी पीएफ खाते ट्रान्सफर करण्याच्या प्रक्रियेत कर्मचारी भविष्य निधी संघटनेने सुलभता आणली आहे. त्यांच्या निवेदनानुसार, काही प्रकरणात पीएफ खाते स्थानांतरित करण्यासाठी जुन्या किंवा नव्या कंपनीकडे ऑनलाइन अर्ज भरण्याची गरज नाही. खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या मुळ वेतनावर बारा टक्के पीएफ कापून घेतला जातो आणि तेवढीच रक्कम ही कंपनीकडून कर्मचाऱ्यांच्या पीएफ खात्यात जमा केली जाते. कंपनीकडून जमा होणाऱ्या पैशात ८.३३ टक्के वाटा ईपीएसमध्ये (कर्मचारी पेन्शन योजना) तर उर्वरित ३.६७ टक्के वाटा हा ईपीएफमध्ये जातो.

नव्या नियमानुसार, सदस्य स्वत:च खाते ट्रान्सफर करण्यासाठी दावा करू शकतात. अर्जाची प्रक्रिया करण्याची आवश्यकता नाही. एकप्रकारे नोकरी बदलल्यानंतर सदस्यांना जुन्या किंवा नव्या कंपन्यांमार्फत प्रॉव्हिडंड फंड ट्रान्सफर करण्याचा नियम काही प्रकरणात बासनात गुंडाळून ठेवला आहे.

**नियम आता सुलभ**

भविष्य निर्वाह निधी संघटननेने पंधरा जानेवारी रोजी एक अधिसूचना जारी केली. यात नोकरी बदलल्यास पीएफ खाते स्थानांतर करण्याची प्रक्रिया सुलभ केली आहे. याप्रमाणे विद्यमान किंवा नव्या कंपनीकडून पीएफ खाते ट्रान्सफर करण्याचा अधिकार संपुष्टात आणला आहे.

**बेध**




**प्रकरणात**

**दिलासा**

एकच युएएन अंतर्गत ट्रान्सफर: सदस्याला युनिव्हर्सल अकाउंट नंबर १ ऑक्टोबर २०१७ रोजी किंवा त्यानंतर दिलेला असेल आणि तो आधार नंबरशी जोडलेला असेल तर आणि यानुसार एकच यूएएन नंबर असलेल्या सदस्याला पीएफ खाते स्थानांतर करायचे असेल तर त्यास नव्या नियमांचा लाभ मिळणार आहे.

विविध युएएनदरम्यान ट्रान्सफर (दोन्ही युएएन १ ऑक्टोबर २०१७ रोजी किंवा त्यानंतर जारी केलेला असेल तर): कर्मचाऱ्याकडे एकाच आधारशी संबंधित अनेक यूएएन जोडलेले असतील आणि सिस्टिम त्यास एकच व्यक्ती म्हणून ओळखत असेल तर कंपनीच्या हस्तक्षेपाशिवाय सीमलेस ट्रान्सफर करण्याची परवानगी मिळते.

एकच युएएनतंगत ट्रान्सफर (१ ऑक्टोबर २०१७ पूर्वी जारी केलेला युएएन) : जुन्या यूएएनसाठी पीएफ ट्रान्सफर करायचे असेल तर त्यासाठी आधार जोडलेला असणे आवश्यक आहे आणि मेंबरच्या आयडीतील विवरण हे मिळतेजुळते असणे आवश्यक आहे. यात सदस्याचे नाव, जन्मतारीख आणि लिंग सारखे असणे आवश्यक आहे.

विविध युएएनदरम्यान ट्रान्सफर (१ ऑक्टोबर २०१७ पूर्वी जारी केलेले युएएन): अनेक युएएन (एक जुने) मध्ये पीएफ ट्रान्सफरची परवानगी आहे. मात्र दोन्ही युएएन एकाच आधारशी जोडलेले असतील आणि व्यक्तिगत विवरण मिळतेजुळते असेल तर.यानुसार सर्व प्रकरणात युएएन आधारशी जोडलेले असेल आणि वैयक्तिक माहिती मिळतीजुळती असेल तर कंपनीच्या पडताळणीशिवाय वेगाने पीएफ ट्रान्सफर होण्याची प्रकि या पार पडेल, भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या अधिसूचनेनुसार वरील सर्व प्रकरणातील सदस्य पीएफ ट्रान्सफर करण्यासाठी दावा करू शकतात. म्हणजे युएएन आधारशी जोडलेला असेल आणि अर्जदारांची माहिती सर्वच ठिकाणी सारखीच आणि मिळतीजुळती असेल तर कंपनीकडून पडताळणी न करताही पीएफ खाते ट्रान्सफर करता येऊ शकते. ◆◆◆

